दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

संत नामदेव महाराज पुण्यतिथी महोत्सव

शुक्रवारी विविध धार्मिक कार्यक्रम

सेलू : विदर्भाची प्रती पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र घोराड येथे संत नामदेव महाराज पुण्यतिथी महोत्सवाला प्रारंभ झाला असून शुक्रवारी कीर्तन , काल्हा दहीहंडी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

घोराड येथे दोन संत होऊन गेले संत केजाजी महाराज व त्यांचे पुत्र संत नामदेव महाराज त्या मुळे घोराड ही प्रती पंढरी म्हणून ओळखल्या जाते.

त्याच संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाला दिनांक ५ पासून सुरुवात झाली असून दिनांक ७ शुक्रवारी विठ्ठल रुख्माई देवस्थान मध्ये दुपारी लक्ष्मण महाराज गुडवार यांचे काल्याचे कीर्तन होणार असून टाळ मृदुंगाचा निनदात दिंडी निघणार आहे गो माता मंदिरावर दही हंडी कार्यक्रम होतात्च महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे यासाठी विठ्ठल रुख्माई देवस्थान ट्रस्ट व अन्न छत्र मंडळ कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्नरत आहे. भक्ती रंगात भक्तिरसाचा आनंद भाविकांना मिळणार आहे.

*(आष्टी) वर्धा *गुरुवार, ६ ऑगस्ट २०२६ *वर्ष ४ थे *अंक २०४ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

करंजा मत्स्य बंदर प्रकल्प कामांसाठी अत्याधुनिक यंत्रणेसह अनुभवी मनुष्यबळाचा वापर करावा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई : रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील करंजा मत्स्य बंदराच्या प्रकल्पातून वार्षिक ४,५०० मेट्रिक टन मत्स्य उत्पादन हाताळण्याची क्षमता निर्माण होणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यातील कामांसाठी १४९ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली होती. मंजूर कामे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने (एमएमबी) पूर्ण केली असून उर्वरित कामे गतीने होण्यासाठी अनुभवी तंत्रज्ञ आणि आधुनिक यंत्रणेचा वापर करावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली व्यय अग्रक्रम समितीची बैठक झाली. यावेळी विविध विकास प्रकल्पाबाबत चर्चा झाली. मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन. यांनी करंजा बंदराच्या विकासाबद्दल माहिती सादर केली. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, वित्त (व्यय) विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, यासह विविध विभागांचे प्रधान सचिव, सचिव आणि प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, करंजा मत्स्य बंदर विकास प्रकल्प ५,२३ हेक्टर क्षेत्रावर विकसित करण्यात येत असून, या बंदरावर ६,६०० मच्छीमारांना सुविधा उपलब्ध होणार आहे. ही कामे पूर्ण करण्यास गती देण्यात यावी. पहिल्या टप्प्यात या प्रकल्पासाठी केंद्र व राज्य सरकाने ५० : ५० या प्रमाणात हिस्सा आहे. आतापर्यंत १३६.३९ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. राज्य शासनाकडून ७४.९० कोटी रुपये असा निधी तर केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाकडून १४ कोटी रुपये, केंद्रीय नौवहन मंत्रालयाकडून ६०.९० कोटी रुपये मंजूर करण्यात आला आहेत. यामध्ये मंजूर २४ कामांपैकी १३ पूर्ण झाली आहेत.

दुसऱ्या टप्प्यात पायाभूत सुविधांच्या उभारणीस मिळणार गती ४,५०० मेट्रिक टन मत्स्य उत्पादन हाताळण्याची क्षमता

करंजा मत्स्य बंदर विकासासाठी अत्याधुनिक सुविधा विकसित

करंजा मत्स्य बंदराचा विकास पूर्ण झाल्यानंतर मच्छीमारांना आधुनिक सुविधा उपलब्ध होण्यासोबतच मत्स्य व्यवसायाला चालना मिळणार आहे. प्रकल्पांतर्गत आतापर्यंत अतिरिक्त क्वे वॉल, प्रवेश जलमार्गाचे रुंदीकरण, बोट पार्किंग, काँक्रीट पृष्ठभाग, चार आधुनिक मासळी लिलाव हॉल, मत्स्य प्रशासन कार्यालय, फिशिंग गिअर शेड, जाळी दुरुस्ती शेड, मच्छीमार विश्रांतीगृह, रेस्टॉरंट, रेडिओ कम्युनिकेशन स्टेशन, गार्ड हाऊस, कंपाउंड वॉल आणि सुशोभीकरण आदी अत्याधुनिक सुविधा विकसित करण्यात येत आहेत.

उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाकडे (एमएफडीसी) प्रस्ताव प्राप्त झाला असून, करंजा मत्स्य बंदर विकासाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठी १५१.२९ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. शासनाने या प्रस्तावात आवश्यक सुधारणा करून पुनर्सादर करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

या प्रकल्पांतर्गत ३७० रनिंग मीटर अतिरिक्त क्वे वॉल उभारण्यात येणार असून, प्रवेश जलमार्ग रुंदीकरण तसेच बोट पार्किंगची अतिरिक्त सुविधा विकसित करण्यात येणार आहे. मच्छीमारांसाठी चार आधुनिक मासळी लिलाव हॉल, मत्स्य प्रशासन कार्यालय, दोन फिशिंग गिअर शेड, दोन जाळी दुरुस्ती शेड, मच्छीमार विश्रांतीगृह, रेस्टॉरंट, रेडिओ कम्युनिकेशन स्टेशन, गार्ड हाऊस, कंपाउंड वॉल उभारण्यात येणार आहेत. बंदर परिसरात काँक्रीट पृष्ठभाग विकसित करून वाहतूक व माल हाताळणी अधिक सुलभ होणार आहे.

या सर्व सुविधांमुळे मत्स्य बंदराची कार्यक्षमता वाढणार असून मच्छीमारांना सुरक्षित, आधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध होतील. तसेच मासळीच्या विक्री, साठवणूक व वाहतुकीची प्रक्रिया अधिक सुलभ होऊन मत्स्य व्यवसायाच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळेल.

तळेगाव येथे ८ ऑगस्टला छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

महसूलमंत्री व पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्घाटन महसूल व शासकीय सेवांचा एकाच ठिकाणी लाभ



वर्धा (जिमाका) : नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा अधिक सुलभ, पारदर्शक व गतिमान पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी दि.८ ऑगस्ट रोजी आर्वी विधानसभा क्षेत्रात आष्टी तालुक्यातील पी.आर. पाटील कॉलेज, तळेगाव (श्यामजीपंत) येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार, आमदार सुमित वानखेडे आणि जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरास खासदार अमर काळे, आ.अभिजीत वंजारी, आ.सुधाकर अडबाले, आ.अरुण लखानी, आ.समीर कुणावार, आ. राजेश बकाने, आ.सुमित वानखेडे यांची प्रामुख्याने उपस्थिती असणार आहे. शिबिरामध्ये महिलांना शेतकरी दर्जा प्रमाणपत्रांचे वितरण, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना, शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे, जिवंत सातबारा मोहिम, सिंदी विस्थापितांसाठी विशेष अभय योजना, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल योजनांशी संबंधित सुविधा, कुंभार समाजासाठी पारंपरिक व्यवसाय सबलती तसेच कौटुंबिक वाटणीपत्रावरील नोंदणी शुल्क माफीसह विविध महसूल सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. शिबिरात विविध शासकीय विभागांच्या योजनांचा लाभही नागरिकांना एकाच ठिकाणी मिळणार आहे. केंद्र व राज्य शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध योजनांची माहिती व लाभ शिबिरात उपलब्ध राहणार आहेत. आर्वी विधानसभा क्षेत्रातील नागरिकांनी या विशेष शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट यांनी केले आहे.

अंथरुणाला खिळलेल्या १७ वर्षीय तरुणाला दोन्ही कूल्ह्यांच्या प्रत्यारोपणामुळे मिळाले नवजीवन



वर्धा : जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय (जेएनएमसी) आणि आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय (एबीबीआरएच) सावंगी (मेघे), वर्धा येथील अस्थिरोग विभागाने १७ वर्षीय तरुणावर दोन्ही कूल्ह्यांचे (हिप) प्रत्यारोपण यशस्वी प्रत्यारोपण (बिलॅटरल टोटल हिप रिप्लेसमेंट) करून त्याला नवजीवन दिले. ही जटिल शस्त्रक्रिया अस्थिरोग विभागाचे प्रमुख व प्राध्यापक डॉ. गजानन एल. पिसुळकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.हा तरुण ज्युवेनाईल रुमेटॉइड आर्थ्रायटिस आणि एचएलए-बी२७ पॉझिटिव्ह ऑकिलोझिंग स्पॉन्डिलायटिस या आजारांनी ग्रस्त होता. त्यामुळे त्याच्या दोन्ही कूल्ह्यांचे सांधे पूर्णपणे जुळून गेले होते. तीव्र वेदना, शरीरातील विकृती आणि स्नायू मोठ्या प्रमाणात कमकुवत झाल्यामुळे तो अनेक वर्षे अंथरुणाला खिळून होता.त्यामुळे त्याला स्वतःच्या पायावर उभे राहणे किंवा चालणे शक्य नव्हते.

डॉ. पिसुळकर आणि त्यांच्या टीमने १५ दिवसांच्या अंतराने दोन टप्प्यांत दोन्ही कूल्ह्यांचे (टोटल हिप रिप्लेसमेंट) प्रत्यारोपण केले. या शस्त्रक्रियेत अत्याधुनिक सिरॅमिक फेमोरल हेड, जम्बो ॲसिटॅब्युलर कप आणि प्रॉक्सिमली कोटेड फेमोरल स्टेमचा वापर करण्यात आला. शस्त्रक्रियेदरम्यान आधुनिक दर्जाचे इम्प्लांट्स वापरण्यात आले. सांधे पूर्णपणे जुळलेले असल्यामुळे आणि गंभीर विकृती असल्यामुळे ही शस्त्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक होती, मात्र सर्व अडचणींवर मात करत दोन्ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आल्या. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या वेदना मोठ्या प्रमाणात कमी झाल्या असून कूल्ह्यांची हालचाल पुन्हा सुरू झाली आहे. सध्या तो स्वतःच्या पायावर चालू शकावा यासाठी पुनर्वसन (रिहॅबिलिटेशन) उपचार घेत आहे. या यशस्वी उपचारामुळे त्याच्या जीवनात मोठा सकारात्मक बदल झाला आहे.

यावेळी बोलताना डॉ. गजानन एल. पिसुळकर म्हणाले की, अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांसाठी योग्य नियोजन, अनुभवी शल्यचिकित्सक आणि विविध तज्ज्ञांच्या समन्वयाची गरज असते. योग्य वेळी शस्त्रक्रिया केल्यास रुग्णाची हालचाल आणि दैनंदिन कामे करण्याची क्षमता पुन्हा मिळू शकते आणि विशेषतः तरुण रुग्णांना नव्याने आयुष्य जगण्याची संधी मिळते.डॉ. गजानन एल. पिसुळकर आणि अस्थिरोग विभागाच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने या दोन्ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या. या यशामुळे प्रगत सांधा प्रत्यारोपण (जॉइंट रिप्लेसमेंट) आणि गुंतागुंतीच्या हाडे व स्नायूंच्या आजारांवरील उपचारांमध्ये जेएनएमसी-एबीबीआरएचचे कौशल्य पुन्हा एकदा सिद्ध झाले.

'अपयशाने खचू नका; जिद्द, चिकाटी आणि सातत्यानेच यश मिळते!'



वर्धा : 'स्पर्धा जिंकणे महत्त्वाचे नाही, असे नाही. अधिक सराव, अधिक मेहनत आणि अधिक आत्मविश्वासने पुढील वर्षी पुन्हा या व्यासपीठावर या. यश तुमची वाट पाहत असेल,' असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

दिव्यांग बालगायिकेच्या जिद्दीला खासदारांचा सलाम

आपल्या भाषणात त्यांनी अकरा वर्षीय दिव्यांग बालगायिका पल्लवी भोला वानखेडे हिचा विशेष उल्लेख केला. दोन्ही डोळ्यांनी अंध असूनही तिने नागपूर येथील स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावल्याचे सांगत त्यांनी तिच्या जिद्दीचे भरभरून कौतुक केले.

अशा गुणवंत कलाकारांना संधी मिळावी यासाठी स्पर्धेतील वयोमर्यादेत आवश्यक ती शिथिलता देण्याचा विचार आयोजकांनी करावा, अशी सूचनाही त्यांनी केली. अपयशामुळे आत्महत्येची प्रवृत्ती चिंताजनक

कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहनबाबू अग्रवाल होते. यावेळी सुधीरभाऊ पांगुळ अभय पुनेवार, कमलेश ठोंबरे, संदीप पजई, देवेंद्र ठाकूर, रूपेश खैरी, सतीश इखार,प्रवीणभाऊ धोपटे, इकराम हुसैन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेचे प्रमुख संयोजक सुनील बुरांडे यांच्या नेतृत्वाखाली दिलीप मेने, गिरीश सावळेकर, प्रशांत चवडे, प्रभाकर उगेमुगे व साहित्य कला शोधक मंचाच्या सर्व कार्यकर्त्यांनी गेली चाळीस वर्षे हा सांस्कृतिक वारसा उपल्यावलूल खासदार अमर काळे यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.'भो. रफी सुरसंगम' ही स्पर्धा केवळ गायन स्पर्धा नसून, ती नवोदित कलाकारांना आत्मविश्वास, संस्कार आणि यशाकडे नेणारे सांस्कृतिक विद्यापीठ आहे, अशा शब्दांत खासदार अमर काळे यांनी आयोजकांच्या कार्याचा गौरव करत स्पर्धेच्या उज्ज्वल भवितव्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी त्यांनी साहित्य कला शोधक मंचाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विशेषतः गेली चार दशके या स्पर्धेला आर्थिक व नैतिक बळ देणारे ज्येष्ठ समाजसेवक मोहनबाबू अग्रवाल यांच्या दानशूर वृत्तीचा गौरव करत, 'अशा दातृत्ववान व्यक्तींमुळेच सांस्कृतिक चळवळी जिवंत राहतात,' असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

बक्षीस मिळाले नाही म्हणून निराश होऊ नका

स्पर्धेतील विजेत्यांचे अभिनंदन करताना खासदार अमर काळे यांनी बक्षीस न मिळालेल्या स्पर्धकांनाही विशेष धीर दिला. 'आज बक्षीस मिळाले नाही म्हणून उद्या मिळणार नाही, असे नाही. अधिक सराव, अधिक मेहनत आणि अधिक आत्मविश्वासाने पुढील वर्षी पुन्हा या व्यासपीठावर या. यश तुमची वाट पाहत असेल,' असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

हिंगणघाट रेल्वे स्थानकावरील गाड्यांच्या थांबे व सुविधांसाठी नगरपालिकेच्या ठरावाची मागणी

रेल्वे मंत्रालय व विभागीय रेल्वे कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्याची विनंती



हिंगणघाट : कोरोना काळात बंद करण्यात आलेले हिंगणघाट रेल्वे स्थानकावरील विविध रेल्वेगाड्यांचे थांबे पूर्ववत सुरू करावेत, नव्याने सुरू झालेल्या महत्त्वाच्या रेल्वेगाड्यांनाही हिंगणघाट येथे थांबा द्यावा तसेच प्रवाशांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हिंगणघाट नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करून तो रेल्वे मंत्रालय व विभागीय रेल्वे कार्यालयाकडे पाठविण्यात यावा, अशी मागणी वर्धा-बल्लारशाह रेल्वे यात्री संघाच्या वतीने करण्यात आली.

यासंदर्भात हिंगणघाट नगर परिषदेच्या नगराध्यक्षा डॉ. नयना उमेश तुळसकर व मुख्याधिकारी प्रशांत उरकुडे यांना वर्धा-बल्लारशाह रेल्वे यात्री संघाचे अध्यक्ष राजेश अ. कोचर, संघटक दिलीप बालपांडे व सचिव डी. के. गुरनुले यांनी निवेदन सादर केले.

निवेदनात कोरबा-तिरुवनंतपुरम, इंदौर-तिरुवनंतपुरम, गोरखपूर-चारलापल्ली, गोरखपूर-यशवंतपूर, कोयंबतूर-जयपूर, मैसूर-जयपूर व बरौनी-एर्नाकुलम एक्सप्रेस या गाड्यांचे कोरोना काळात बंद झालेले थांबे तातडीने पूर्ववत सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच चेन्नई सेंट्रल-भगत की कोठी, पुरी-ओखा, बंगळुरू-दानापूर, तिरुवनंतपुरम-नवी दिल्ली, सिकंदराबाद-रायपूर, जोधपूर-तांबरम, सिकंदराबाद-हिसार, कोल्हापूर-धनबाद व विशाखापट्टणम-गांधीधाम एक्सप्रेस या हिंगणघाट येथे थांबा नसलेल्या महत्त्वाच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणीही करण्यात आली.याशिवाय पुणे-काजीपेठ व मुंबई-बल्लारशाह एक्सप्रेस दरोज चालविण्यात याव्यात, भुसावळ-वर्धा पॅसेंजरचा विस्तार बल्लारशाहपर्यंत करण्यात यावा तसेच काजीपेठ-अजनी व नागपूर-बल्लारशाह पॅसेंजर तातडीने सुरू करण्यात याव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली.हिंगणघाट हे औद्योगिक, व्यापारी व शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर असून परिसरातील हजारो विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी, शेतकरी व सर्वसामान्य प्रवासी दररोज रेल्वे सेवेवर अवलंबून आहेत. त्यामुळे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी हिंगणघाट नगर परिषदेने या विषयावर सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करून तो रेल्वे मंत्रालय व विभागीय रेल्वे कार्यालयाकडे तातडीने पाठवावा, अशी अपेक्षा वर्धा-बल्लारशाह रेल्वे यात्री संघाने व्यक्त केली आहे.

संपादकीय

पायी चालण्यावर जागोजागी 'अतिक्रमण'



सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्देशांमुळे देशातील शहरे, नगरपरिषदा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसमोर एक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आव्हान उभे राहिले आहे. या निर्णयात न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, जिथे रस्ता आहे तिथे पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि अतिक्रमणमुक्त जागा असलीच पाहिजे. यासाठी मोठ्या निधीची किंवा नवीन प्रकल्पांची वाट न पाहता आवश्यक असल्यास दोरी लावूनही पदपथ अर्थात फूटपाथ वेगळा करा, पण पादचा-यांना सुरक्षित पायी चालण्याच्या हक्कावर अतिक्रमण होऊ देऊ नका.

भारतातील बहुतांश शहरांमध्ये रुंद रस्ते, उड्डाणपूल आणि वाहनांसाठी अधिक जागा निर्माण झाल्या आहेत. मात्र ही सुविधा उभारताना शहरातील अंतर्गत मार्गांवर पायी चालणारा नागरिक कायमच दुय्यम ठरला आहे. अनेक शहरांत पदपथच नाहीत. जिथे आहेत तिथे दुकाने, फेरीवाले, पार्किंग किंवा बांधकाम साहित्याने ते व्यापलेले असतात. परिणामी नागरिकांना जीव धोक्यात घालून मुख्य रस्त्यावरून चालावे लागते. रस्ते अपघातांच्या आकडेवारीतही ही वस्तुस्थिती दिसून येते. शासनाच्या रस्ते अपघात अहवालानुसार २०२४ साली रस्ते अपघातात १ लाख ७७ हजार १७५ लोकांचा मृत्यू झाला. यात ३६ हजार ५२६ मृत्यू पायी चालणाऱ्या व्यक्तींचे होते. ही संख्या टक्केवारीनुसार २०.०६ इतकी आहे. २०२३ साली देखील ३६ हजार २०३ पादचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. म्हणजेच रस्त्यांवरील सर्वांत असुरक्षित घटक हा पायी चालणारा नागरिक आहे. वाहनांसाठी नियम, लेन, सिग्नल आणि सुरक्षा उपाय आहेत, पण पादचाऱ्यांसाठी सुरक्षित जागाच नसणे हे दुर्दैव नव्हे का? सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही पायी चालणे हा मूलभूत अधिकाराचा भाग असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र यावेळी न्यायालयाने प्रत्यक्ष अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. दोन आठवड्यांत संबंधित यंत्रणांनी कृती आराखडा सादर करावा, असे आदेश देत न्यायालयाने प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून दिली आहे.

महाराष्ट्रातील अनेक शहरांत प्रमुख रस्त्यांवर पदपथ अस्तित्वातच नाहीत. जिथे आहेत, तिथे अतिक्रमण, अनधिकृत पार्किंग किंवा विविध व्यावसायिक वापरामुळे ते पादचाऱ्यांसाठी उपयोगी ठरत नाहीत. अशा ठिकाणी वृद्ध, महिला, दिव्यांग, विद्यार्थी आणि लहान मुलांना दररोज जीव मुठीत धरून चालावे लागते. मुख्यतः जिथे पादचारी मार्ग आहे तिथे झालेले अतिक्रमण हा त्या-त्या शहराचा कळीचा मुद्दा आहे. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नियोजित फेरीवाला क्षेत्रे, पर्यायी जागा आणि प्रभावी वाहतूक नियोजन यांचा समतोल साधला पाहिजे. मात्र कोणत्याही परिस्थितीत पदपथावर कायमस्वरूपी अतिक्रमण हे मूलभूत व्यवस्था कोलमडणारे ठरत असल्याने याबाबत कठोर निर्णय घ्यावेच लागतील.

यासंदर्भात नागरिकांची देखील जबाबदारी आहेच. अनेकदा वाहनचालक स्वतःच पदपथावर वाहने उभी करतात. दुकानदार त्यांच्या दुकानातील वस्तू पदपथावर ठेवतात. काही ठिकाणी तर नागरिक पदपथाऐवजी रस्त्यावरून चालणे पसंत करतात. त्यामुळे प्रशासनाच्या उपाययोजना सोबतच नागरिकांनी देखील जबाबदारीचे भान ठेवणे तितकेच आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने पादचाऱ्यांच्या मूलभूत हक्कासाठी दिलेल्या निर्देशांचे स्वागतच केले पाहिजे. मात्र या संदर्भात अंमलबजावणी किती प्रामाणिकपणे होते, हे अधिक महत्त्वाचे आहे. अनेकदा न्यायालयीन आदेश काही दिवस चर्चेत राहतात आणि नंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. या वेळी तसे होऊ नये. प्रत्येक शहराने पदपथांचे सर्वेक्षण करून अतिक्रमणमुक्ती, देखभाल आणि नवीन पदपथ उभारणीसाठी प्रामाणिकपणे पुढाकार घ्यावा. खरं म्हणजे पदपथ हा पादचाऱ्यांचा मूलभूत नागरी हक्क आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारा सर्वांत दुर्लक्षित, उपेक्षित घटक असणाऱ्या पादचाऱ्यांकरिता सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले. याच्या अंमलबजावणीची जबाबदारी आता प्रशासनाची आहे. पण प्रशासन करेल या अपेक्षेत न राहता नागरिक आणि लोकप्रतिनिधींना देखील या निर्देशांबाबत आग्रही व्हावे लागेल. तरच पादचारी मार्गावरील अतिक्रमण हटवून 'रस्त्यांवर पहिला अधिकार माणसांचा आहे, वाहनांचा नाही' आणि 'पायी चालणे हा मूलभूत अधिकार आहे' हा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला संदेश उपयोगी ठरेल.

कीर्तनातून लोकजागृती कधी झाली?

(लोककलाः कीर्तन विशेष.)

भागवत संप्रदायातील एक प्रसिद्ध संकल्पना ज्यामध्ये पौराणिक कथा संगीताच्या माध्यमातून सांगितली जाते. वेगवेगळ्या पद्धतीने काव्य, संगीत, अभिनय आणि क्वचित नृत्य यांच्यासह सादर करीत असलेल्या भक्तिरसपूर्ण कथारूप एकपात्री निवेदनाला कीर्तन असे म्हणतात, आणि हे करणाऱ्या व्यक्तीला कीर्तनकार म्हटले जाते. भारतातल्या सर्व प्रदेशांत, सर्व भाषांत आणि सर्व संप्रदायांत कीर्तन हा प्रकार आढळतो. नवविधा भक्तीपैकी कीर्तन हा दुसरा प्रकार आहे. त्याविषयींची चटकदार व ज्ञानवर्धक माहिती श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींच्या या लेखात आवर्जून वाचाच... संपादक.

महाराष्ट्रात कीर्तनाची परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे. येथे होणाऱ्या कीर्तनांत नारदीय कीर्तन आणि वारकरी कीर्तन असे दोन मुख्य प्रकार आहेत. नारद हा भारतातील आद्य कीर्तनकार आहे, असे मानले जाते. शब्द व्युत्पत्ती आणि व्याख्या आरंभ- कीर्तन हा शब्द संस्कृतात 'क?त?' या दहाव्या गणातल्या धातूपासून झाला आहे. या धातूचा अर्थ उच्चारणे, सांगणे असा होतो. कीर्तन ज्या स्थानावर उभे राहून करतात ते स्थान म्हणजे देवर्षी नारदांची कीर्तनाची गादी होय. या कीर्तनाच्या पद्धतींच्या अनेक व्याख्या आणि संकल्पना भरत महामुनींच्या नाट्यशास्त्रापासून केल्या गेल्या. कीर्तनाचा इतिहास- भारतवर्षात नारदमुनींनी कीर्तनाचा आरंभ केला. नारदमुनींनी ते महर्षी व्यासांस शिकवले, व्यास महर्षींनी शुकास शिकवले आणि पुढे त्याचा सर्वत्र प्रसार झाला, अशी कीर्तन परंपरा सांगितली जाते. पुढे ती मराठीत रूजली-

'संस्कृताचि गाठी।
उघडोनी ज्ञान दृष्टी?
केलीसे मराठी।
गीता देवी?'

वस्तुतः श्रीहरिकीर्तन खेड्यापाड्यात पोहोचले आहे. सर्व लोकांना ईशभक्तीमध्ये रममाण करणे हा कीर्तनाचा उद्देश आहे. अनेक कीर्तनकारांनी त्यांच्या कीर्तनांनी शिवाजी महाराजांच्या काळात व ब्रिटिशांच्या काळात लोकजागृतीचे काम केले. नारदीय कीर्तन अणि वैयासिक कीर्तन- महर्षी व्यासानी सुरू केलेले, असे दोनच कीर्तन प्रकार होते. एक संगीत- नाट्यमय अणि दुसरा गद्यात सांगितला जाणारा असे यातील फरक आहेत.

श्रीमद्भगवद् गीतेत नवविधा भक्तीमध्ये कीर्तन ही एक भक्ती असल्याचे वर्णन आहे. नऊ प्रकारांपैकी कीर्तन ही एक भक्ती आहे. कीर्तनाचे गुण संकीर्तन, नामसंकीर्तन, कथा संकीर्तन असे विविध प्रकार आहेत. 'कीर्त' या संस्कृत शद्बावरून कीर्तन हा शब्द आला आहे. पवित्र भगवतगीता ग्रंथराज हा भगवंताचे अणि थोर विभूतींचे गुणगायन करणारा व पराक्रमाचे वर्णन करणारा हा प्राचीन कला प्रकार आहे. नंतरच्या काळात नारदीय कीर्तनातून वारकरी, रामदासी, राष्ट्रीय कीर्तन असे वेगळे संप्रदाय निर्माण झाले. पण संपूर्ण भारतातील कीर्तनात थोडा फार बाह्यरूपात बदल झाला, तरी त्याचा मूळ गाभा कायम राखून आहे. स्वातंत्र्य चळवळीतसुद्धा कीर्तनकारांनी समाजाच्या जागृतीचे उल्लेखनीय कार्य केलेले आहे, मात्र महाराजांनी मानधन घेवू नये. कीर्तन ही खरेतर मूलतः एक भक्ती आहे. श्रीमद्? भागवतात सांगितल्याप्रमाणे नवविधा भक्तींपैकी ही दुसरी भक्ती आहे-

'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्!
अर्चनं वन्दनं दास्यं, सख्यं आत्मनिवेदनम्!'

अशा ९ भक्तींपैकी एक आहे. कीर्तन हे पूर्वी प्रसार, प्रचार, लोकशिक्षण, आणि समाजप्रबोधनाचे एक उत्तम माध्यम होते. काळाच्या ओघात अणि प्रसार माध्यमांच्या प्रगतीमुळे आज कीर्तनाचे महत्त्व कमी झाले असले, तरी आजही धार्मिक उत्सव अणि नित्य उपक्रमांत अणि काही मंदिरांत नियम म्हणून १२ महिने कीर्तन करण्याचा प्रघात आहे. कीर्तनकार कथा सांगत असल्याने त्यांस कथेकरीबुवा असेही म्हणतात. संतशिरोमणी नामदेवजी महाराज म्हणतात-

'गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी।
ब्रह्मानंद लहरी प्रकट केली।।
अध्यात्म विद्येचे लाविलेसे रोप।
चैतन्याचा दीप उजळीला।।
छप्पन्न भाषेचा केलासे गौरव।
भवार्णवी नाव उभारीली।।'

कीर्तनाची अंगे- वारकरी कीर्तनात पूर्वरंग आणि आख्यान असे दोन वेगळे विभाग नसतात. संतांच्या अभंगाचे गायन आणि त्यावर निरूपण अशा पद्धतीचे आणि टाळ मृदुंगाच्या घोषात २०-२५ साथीदारांसोबत वारकरी कीर्तन सादर केले जाते. वारकरी कीर्तनाची परंपरा खूप पुरातन आहे. मंदिरात सादर होणारे हे कीर्तन संतश्रेष्ठ नामदेव महाराजांनी चंद्रभागेच्या काठावर आणून जनसामान्यांना खुले करून एक नवी परंपरा सुरू केली. वारकरी कीर्तन हे आळंदी येथे वारकरी महाविद्यालयात शिकविले जाते. या माधमातून संतानी भक्तीमार्ग शिकविला. संत नामदेवांनी वारकरी कीर्तन संस्थेचा पाया घातला. वारकरी कीर्तन ही सांस्कृतिक लोकशाहीची पायाभरणी ठरली-

'नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग।
जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग?'

(पवित्र श्रीसकल संतगाथा)

रामदासी कीर्तन- रामदासी कीर्तन परंपरा ही समर्थ रामदास स्वामी यांनी सुरू केली. रामदासी कीर्तन हे मुख्यतः समर्थांच्या रचनांवर आधारीत असते. आख्यानेसुद्धा रामकथा आणि रामभक्ती यावरच मुख्यतः आधारीत असतात. श्रीधरस्वामी, केशवस्वामी, रंगनाथ स्वामी अशा रामदासी परंपरेतील संतांच्या रचना आणि पदे यांचाही समावेश केला जातो. रामदासी कीर्तन हे आजही परंपरागत गुरुकुल पद्धतीनेच शिकविले जाते. कीर्तनांचे आधुनिक प्रकार- १) संयुक्त कीर्तन, २) जुगलबंदी कीर्तन, ३) राष्ट्रीय कीर्तन, ४) वैज्ञानिक कीर्तन असे अनेकानेक आढळून येतात. कीर्तन आणि पदे- पदांबद्दल इतर सर्वसाधारण विश्वकोशीय माहिती या विभागात लिहावी. ज्या कीर्तनकारांच्या मृत्यूस ६१पेक्षा अधिक वर्षे झाली असतील, अशा कीर्तनकारांची पदे जशीच्या तशी विकिस्रोत या बंधुप्रकल्पात जतन करतात. कीर्तन आणि संगीत- पुढे कीर्तनाला संगीताची साथ लाभली. टाळ, मृदंग, एकतारी ही वाद्ये साथीला घेऊ लागले. हल्ली पेटी तबला तर कधी बासरी अशी वाद्ये वापरली जातात. ग्रामीण भागात कीर्तन परंपरा जपली जात आहे, हे अभिमानास्पदच!

'नाचू कीर्तनाचे रंगी।
ज्ञानदीप लावू जगी।।'

- संतचरणरज -
श्रीकृष्णदास (बापू)
निरंकारी. गडचिरोली, फक्त
व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

समता आणि समानता.

अंजू आणि मंजू दोघी सख्ख्या बहिणी सुट्टीच्या दिवशी त्यांच्या घरच्या शेतामध्ये आई-वडिलासोबत कापूस वेचण्यासाठी गेल्या. आई-वडिलासोबत दिवसभर कापूस वेचून सायंकाळी आपापल्या कापसाचं प्रत्येकांनी गाठोड बांधलं. सायंकाळी सर्वजन घरी आल्यावर बाबाने सर्वांच्या गाठोड्याचं वजन केले असता आईच्या कापसाच्या गाठोड्याचं वजन ८५ किलोग्रॅम भरलं. स्वतःच्या गाठोड्याचं वजन केलं असता ते ६७ किलोग्रॅम भरलं. अंजूच्या गाठोड्याचं वजन ५४ किलोग्रॅम व मंजूच्या गाठोड्याचं वजन ३५ किलोग्रॅम असं भरलं.

दोघी बहिणींनी दिवसभर कापूस वेचण्यासाठी शेतकामात मदत केल्यामुळे त्यांच्या आई-बाबाला खूप आनंद झाला. वर्गकार्यात, घरकामात व शेतकामात दोघीही त्यांच प्रामाणिक योगदान देत असल्यामुळे बाबाने दोघींनाही एकाच किंमतीचा व एक सारख्या रंगाचा ड्रेस बाजारातून खरेदी केला. शाळेतून दोघी घरी आल्यावर बाबाने त्यांना ड्रेस दाखविला असता मंजूला खूप आनंद झाला व ती धावतच बाबाला आनंदाने बिलगली. अंजूला मात्र मंजूपेक्षा कमी आनंद झाला. तिच्या चेहऱ्यावर नाराजीचे भाव स्पष्ट जाणवत होते. बाबाने कारण विचारले असता अंजू म्हणाली, मी मंजूपेक्षा जास्त कापूस वेचला. तिच्यापेक्षा मी जास्त काम करते, मग मला तिच्या पेक्षा जास्त किंमतीचा ड्रेस हवा होता.

बाबाने अंजूला विश्वासात व जवळ घेऊन प्रश्न केले. - तू मंजूपेक्षा जास्त कापूस वेचण्याचं कारण काय? तू तिच्यापेक्षा जास्त काम करण्याचं कारण काय? त्यावर अंजू म्हणाली, मी तिच्यापेक्षा वयाने मोठी आहे. माझी शारीरिक क्षमता तिच्यापेक्षा जास्त आहे. माझी कार्यक्षमता तिच्यापेक्षा अधिक आहे. माझी काम करण्याची गती तिच्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. मी तिच्यापेक्षा अधिक चपळ आहे. छान बेटा, तुला हे माहीत असूनही तू नाराज हे काही मला आवडले नाही. याचा अर्थ तिच्या वयोमानानुसार, तिच्या शारीरिक क्षमतेनुसार, तिच्या कार्यक्षमतेनुसार, तिच्या काम करण्याच्या गतीनुसार तिच्या जागी ती योग्य व बरोबर आहे. म्हणजे तिने वेचलेल्या कापसाचे मूल्य, ती काम करण्याचे मूल्य मला तू वेचलेल्या कापसाएवढेच, तू करत असलेल्या कामाएवढेच आहे. म्हणजेच दोघींचेही मूल्य माझ्यासाठी सारखे, समानच आहे. अंजू बेटा एक गोष्ट नेहमी लक्षात ठेव, आपापल्या क्षमतेनुसार, गतीनुसार प्रत्येकाचं कार्य उत्कृष्टचं असते. प्रत्येकाची काम करण्याची क्षमता, गती कमी अधिक असते. व्यक्तीपरत्वे नैसर्गिक भिन्नता असते. त्यामुळे प्रत्येकजन त्यांच काम हे त्यांच्या क्षमतेच्या, गतीच्या, कौशल्याच्या पातळीनुसार पूर्णत्वास नेतचं असतात. त्यामुळे कधीही कोणालाही कमी लेखू नये. शेवटी अंजूला तिची चूक लक्षात आली. तिने मंजूला जवळ घेतले व दोघीही नवीन ड्रेस सह बाबाला आनंदाने बिलगल्या.

गोष्ट निर्मिती व लेखन। संतोष मो. मनवर जि.प.उ.प्रा.शाळा पंचाळा.

ठाकरे वारशाचा प्रवास उलगडणारी पुस्तके

तीन वेगवेगळ्या काळांचे, तीन वेगवेगळ्या शैलींचे आणि तीन वेगवेगळ्या आशयांचे हे ग्रंथ एकत्रितपणे वाचले तर महाराष्ट्राच्या वैचारिक, पत्रकारितेच्या आणि राजकीय प्रवासाचे एक व्यापक चित्र उभे राहते.

विचार, व्यंग आणि वैचारिक संघर्ष 'मार्मिक प्रबोधनाचे शतक', 'मर्मभेद' आणि 'ज्वलंत रेषा' डिंपल पब्लिकेशनच्या तीन पुस्तकांतून उलगडणारा ठाकरे वारशाचा प्रवास महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासात ठाकरे कुटुंबाचे स्थान केवळ एका राजकीय पक्षापुरते मर्यादित नाही. प्रबोधनकार ठाकरे यांनी समाजप्रबोधनाची मशाल पेटवली, बाळासाहेब ठाकरे यांनी त्या मशालीला व्यंगचित्र, पत्रकारिता आणि राजकीय चळवळीची धार दिली, तर समकालीन राजकारणात या वारशाचे विविध अर्थ लावले जात आहेत. या संपूर्ण प्रवासाचा वेगवेगळ्या अंगांनी वेध घेणारी 'मार्मिक प्रबोधनाचे शतक', 'ज्वलंत रेषा' आणि 'मर्मभेद' ही तीन नवीन पुस्तके २९ जुलै रोजी प्रकाशित होत आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे, त्यांच्या सुविद्य पत्नी रश्मी ठाकरे, युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे हे ठाकरे कुटुंब या पुस्तक प्रकाशनाचे प्रमुख मान्यवर आहेतच, त्याचसोबत ज्येष्ठ संपादक, माजी खासदार कुमार केतकर हे देखील या कार्यक्रमासाठी आवर्जून येणार आहेत. दै. 'सुराज्य'चे संपादक राकेश टोळ्ये, दै. 'नवशक्ति'चे संपादक प्रकाश सावंत, मार्मिक साप्ताहिकाचे संपादक मुकेश माचकर यांच्यासोबतच राज्यातील प्रमुख संपादक आणि ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. ही तीनही पुस्तके एकत्र वाचली तर ती स्वतंत्र पुस्तके न राहता महाराष्ट्राच्या वैचारिक इतिहासाचा एक सलग दस्तावेज बनतात.

या तिन्ही ग्रंथांचा केंद्रबिंदू एकच आहे. विचारांना कृतीची जोड मिळाली तर इतिहास घडतो. मात्र प्रत्येक ग्रंथ हा त्या इतिहासाच्या वेगळ्या टप्प्यावर प्रकाश टाकतो. एक ग्रंथ वैचारिक मुळे शोधतो, दुसरा त्या विचारांच्या कलात्मक अभिव्यक्तीचा मागोवा घेतो आणि तिसरा त्या विचारांचे समकालीन राजकारणातील प्रतिबिंब दाखवतो.

'मार्मिक प्रबोधनाचे शतक' हा ग्रंथ प्रबोधनकार ठाकरे आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या वैचारिक सातत्याचा शोध घेतो. प्रबोधनकारांनी अंधश्रद्धा, जातिभेद, सामाजिक विषमता आणि अन्यायाविरुद्ध उभारलेली लेखणी पुढे बाळासाहेबांच्या 'मार्मिक' आणि 'सामना' मधून राजकीय भाषेत व्यक्त झाली, हे या ग्रंथाचे प्रमुख प्रतिपादन आहे. विशेष म्हणजे, शंभर वर्षांपूर्वीच्या प्रबोधन पाक्षिकातील मूळ लेखांचे पुनर्मुद्रण करून हा ग्रंथ केवळ चरित्र राहत नाही, तर प्राथमिक ऐतिहासिक स्रोत जपणारा संदर्भग्रंथ ठरतो. या ग्रंथाचे मोठे यश म्हणजे तो व्यक्तिपूजा न करता विचारांच्या उत्क्रांतीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करतो. प्रबोधनकारांच्या समाजसुधारणावादी भूमिकेपासून मराठी अस्मिता आणि पुढे हिंदुत्वाच्या राजकीय मांडणीपर्यंतचा प्रवास एका सलग वैचारिक धाग्यात गुंफण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. काही ठिकाणी अधिक चिकित्सक तुलना अपेक्षित वाटली तरी ग्रंथाचे संदर्भमूल्य त्यामुळे कमी होत नाही. याच विचारप्रवाहाचे कलात्मक रूप 'ज्वलंत रेषा' या ग्रंथात दिसते. बाळासाहेब ठाकरे यांची ओळख अनेकांना राजकारणी म्हणून आहे; पण त्याआधी ते एक विलक्षण व्यंगचित्रकार होते. या पुस्तकात अनेक ज्येष्ठ व्यंगचित्रकारांनी त्यांच्या कलेचा अभ्यास केला आहे. बाळासाहेबांच्या प्रत्येक रेषेत सामाजिक भाष्य, राजकीय उपरोध आणि सामान्य माणसाच्या वेदनांचा आवाज होता, हे पुस्तक प्रभावीपणे दाखवते. व्यंगचित्र हे केवळ हास्यनिर्मितीचे साधन नसून ते समाजाला आरसा दाखवणारे माध्यम आहे, ही संकल्पना या पुस्तकातून ठळकपणे पुढे येते.

प्रवक्ता आणि जनसंपर्कप्रमुख शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष

महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६ : कायदेशीर ओळखीपलीकडचा सामाजिक बदल!

महाराष्ट्रातील शेतीचा इतिहास लिहायचा झाला तर त्यात महिलांच्या श्रमांची नोंद अपरिहार्य आहे. पेरणी, निंदणी, कापणी, पशुपालन, दुग्धव्यवसाय, बीजसंवर्धन, भाजीपाला उत्पादन, शेतीमालाची प्रक्रिया अशा जवळपास प्रत्येक टप्प्यावर महिला वर्षानुवर्षे पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आल्या आहेत. तरीही 'शेतकरी' ही ओळख मात्र बहुतेक वेळा जमिनीच्या सातबाऱ्यावर नाव असलेल्या व्यक्तीपुरतीच मर्यादित राहिली. त्यामुळे प्रत्यक्ष शेती करणाऱ्या लाखो महिलांचे योगदान मान्य असूनही त्यांना कायदेशीर दर्जा, आर्थिक हक्क आणि शासकीय योजनांमध्ये समान प्रवेश मिळत नव्हता. परिणामी पीक कर्ज, पीक विमा, कृषी अनुदान आणि इतर अनेक शासकीय योजनांपासून त्या वंचित राहत होत्या. ही दरी भरून काढण्यासाठी राज्य शासनाने 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' आणण्याचा निर्णय घेतला आहे. हे विधेयक राज्यातील महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकातून राज्य शासनाने शेतीत अहोरात्र काम करणाऱ्या महिलांना एक ओळख दिली आहे. यापुढील काळात कृषी क्षेत्रात यामुळे महिलांचा सहभाग वाढणार आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेत आणि विधानसभेत 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६' हे केवळ नवीन कायदेविषयक पाऊल नाही, तर ग्रामीण समाजरचनेतील एका दीर्घकालीन विसंगतीला उत्तर देण्याचा प्रयत्न आहे. महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता देण्याची ही संकल्पना कृषी क्षेत्रातील लिंगसमतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरू शकते.

महाराष्ट्राने या विधेयकाच्या माध्यमातून एक महत्त्वपूर्ण दिशा दाखविली आहे. पुढील काळात त्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यावर लाखो महिला शेतकऱ्यांच्या आयुष्यात प्रत्यक्ष बदल पडणार आहे. त्यांच्या श्रमांना सन्मान, हक्कांना कायदेशीर आधार आणि विकास प्रक्रियेत समान सहभाग मिळवून देण्याची क्षमता या विधेयकात आहे. महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता, समान हक्क आणि शासनाच्या सर्व कृषी योजनांचा लाभ मिळवून देणारे 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' विधानपरिषदेत आणि विधानसभेत मंजूर करण्यात आले आहे. हे विधेयक राज्यातील महिलांसाठी एक ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे. या विधेयकाच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना प्रथमच स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख मिळणार असून, महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर बहुमान देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली कृषी विभागाने हे विधेयक तयार केले आहे.

या विधेयकाची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे 'शेतकरी' या संकल्पनेचा विस्तार. शेती ही केवळ पिकांच्या उत्पादनापुरती मर्यादित नसून पशुपालन, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशी पालन, रेशीम उद्योग, कृषी वानिकी, सेंद्रिय शेती, मशरूम उत्पादन, वनोपज संकलन आणि इतर पूरक व्यवसाय यांचाही त्यात समावेश आहे, ही वस्तुस्थिती या विधेयकाने स्वीकारली आहे. यामुळे भूमिहीन, भाडेपट्ट्यावर शेती करणाऱ्या किंवा शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या



महिलांनाही प्रथमच स्वतंत्र शेतकरी म्हणून ओळख मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे.

आजही ग्रामीण भागात शेतीतील श्रम आणि मालकी यांच्यात मोठी दरी आहे. अनेक महिला दिवसभर शेतात राबतात; परंतु जमिनीची मालकी त्यांच्या नावावर नसल्यामुळे त्यांना पीक कर्ज, पीक विमा, कृषी अनुदाने, बँक कर्ज किंवा शासनाच्या इतर योजनांचा लाभ घेण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. या परिस्थितीत महिला शेतकरी प्रमाणपत्राची संकल्पना महत्त्वाची ठरते. पात्र महिलांना हे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर शासनाच्या विविध कृषी योजनांपर्यंत त्यांची थेट पोहोच निर्माण होणार आहे. विशेष म्हणजे महिलांना शेतकरी म्हणून मान्यता मिळण्याने त्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ होणे शक्य होईल. या निर्णयामुळे पीक कर्ज, पिकांसाठी अनुदान, पीक विमा, बियाणे, खते आणि इतर शासकीय सुविधांचा लाभ त्यांना मिळणार आहे.

विधेयकात महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार करण्याची तरतूदही महत्त्वाची आहे. आज अनेक योजना लाभार्थ्यांची अचूक माहिती उपलब्ध नसल्यामुळे अपेक्षित परिणाम साधू शकत नाहीत. डिजिटल नोंदणीमुळे योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि लाभांचे वितरण अधिक पारदर्शक व परिणामकारक होण्यास मदत होऊ शकते. त्याचबरोबर महिला शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र निधी, कौशल्य विकास, उद्योजकता, आर्थिक सहाय्य आणि बाजारपेठेपर्यंत पोहोच यांसारख्या उपाययोजनांमुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक व्यापक स्वरूपात घडणार आहे.

तथापि, कोणत्याही प्रगतिशील कायद्याचे यश त्याच्या तरतुदींमध्ये नसून प्रत्यक्ष अंमलबजावणीत असते. अनेक ग्रामीण कुटुंबांमध्ये महिलांचे निर्णयस्वातंत्र्य मर्यादित असते. त्यामुळे केवळ कायदेशीर मान्यता मिळाल्याने सर्व समस्या सुटणार नाहीत. महिलांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करणे, स्थानिक स्वराज्य संस्था, कृषी विभाग, सहकारी संस्था आणि बँकांनी संवेदनशीलतेने काम करणे तसेच समाजातील पारंपरिक दृष्टिकोनात बदल घडविणे हीदेखील तितकीच आवश्यक प्रक्रिया आहे. या विधेयकामुळे महिलांच्या श्रमांना प्रथमच संस्थात्मक मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा होत आहे. आजपर्यंत शेतीतील महिलांचे योगदान 'कुटुंबातील मदत' म्हणून पाहिले जात होते; आता त्यांना स्वतंत्र उत्पादक, निर्णयक्षम शेतकरी आणि कृषी अर्थव्यवस्थेतील समान भागीदार म्हणून दर्जा मिळेल. हा बदल केवळ आर्थिक स्थैर्य देण्याचा नसून, सामाजिक बदल आहे.

शेतीचा कणा मजबूत करायचा असेल, तर त्या कण्याला बळ देणाऱ्या महिलांना केवळ सहकारी नव्हे, तर स्वतंत्र शेतकरी म्हणून मान्यता देणे ही काळाची गरज होती. महाराष्ट्राने त्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. आता त्या पावलाला परिणामकारक अंमलबजावणीची जोड मिळाली, तरच या विधेयकाचे ऐतिहासिक महत्त्व खऱ्या अर्थाने सिद्ध होईल.

वर्षा फडके – आंधळे
उपसंचालक (वृत्त)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242

प्रत्यक्ष लेखकाच्या भेटीने यशवंत विद्यालयात रंगली 'कौतुकाची थाप'!



प्रत्यक्ष लेखकाच्या भेटीने यशवंत विद्यालयात रंगली 'कौतुकाची थाप'!
शिक्षणामुळे माणसाचा विकास आणि प्रगती होते- आ. विक्रम काळे
आ. विक्रम काळे व लेखक आयुब पठाण लोहगावकर यांच्या उपस्थितीत विद्यार्थी-शिक्षक संवाद!
'मराठी विषयात एकही विद्यार्थी नापास होऊ नये' यासाठी आ काळे यांचा विशेष उपक्रम

इयत्ता चौथीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'कौतुकाची थाप' या पाठाचे लेखक आयुब पठाण लोहगावकर यांनी प्रत्यक्ष विद्यालयात उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. विविध कथा, गोष्टी आणि उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना अक्षरशः खिळवून ठेवले. 'जुने ते सोने, नवे ते हवे' चा संदेश लेखक आयुब पठाण लोहगावकर यांनी आपल्या रसाळ आणि ओघवत्या शैलीत 'कौतुकाची थाप' या पाठाचे विश्लेषण केले. विविध

उदाहरणे व गोष्टी सांगत बालमनावर चांगले संस्कार, सकारात्मक प्रेरणा आणि आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी हा पाठ लिहिण्यामागील उद्देश स्पष्ट केला. 'जुने ते सोने आणि नवे ते हवे' या विचारातून त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील चांगल्या गोष्टी स्वीकारण्याचा संदेश दिला. पाठ्यपुस्तकात जो लेखकाचा परिचय विद्यार्थ्यांनी वाचला, तोच लेखक आज प्रत्यक्ष आपल्या समोर येऊन आपल्या पाठामागची भूमिका सांगत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. लेखकाच्या कथाकथनाने विद्यार्थ्यांचे बालमन जिंकले.

बीड : माणसाला स्वतःच्या पायावरती उभं करण्याचे काम शिक्षण करतंय. शिक्षण हे तुमच्या जगण्याचं साधन आहे, आपल्या जीवनामध्ये भरारी देण्याचं काम करतंय. शिक्षणामुळे माणसाचा विकास आणि प्रगती होते. त्यामुळे चांगलं शिका, चांगला अभ्यास करा, मेहनत करा, नेहमी खरं बोला आणि शाळेत रोज उपस्थित राहावे असे आवाहन शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी बीड शहरातील यशवंत विद्यालयात लेखक आपल्या भेटीला या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश वाघ हे होते. तर व्यासपीठावर लेखक आयुब पठाण लोहगावकर, संस्थेचे सचिव नामदेवराव वाघ, संस्थाचालक शिक्षण महासंघाचे जिल्हाध्यक्ष दीपक दादा घुमरे, रवींद्र खोड, महेश घरत, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक मधुकर घुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

बीड शहरातील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंत विद्यालयात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच शिक्षक आमदार विक्रम (बाप्पा) काळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी अनोखा आणि प्रेरणादायी शैक्षणिक उपक्रम बुधवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनाने करण्यात आली. त्यानंतर शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ व सचिव नामदेवराव वाघ यांनी आ. विक्रम काळे, लेखक आयुब पठाण लोहगावकर यांच्यासह उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. मान्यवरांच्या स्वागत समारंभा नंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक गणेश वाघ यांनी केले. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी निवडण्यात आलेल्या शाळांच्या विशेष उपक्रमात यशवंत विद्यालयाचा समावेश करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच गणेश वाघ यांनी यावेळी आमदार विक्रम काळे यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि शिक्षकहिताच्या कार्याचा गौरवही आपल्या प्रस्ताविकात केला. त्या नंतर कार्यक्रमात उपस्थित शिक्षक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी मराठी भाषेच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, या वर्षी 'दहावीच्या बोर्ड परीक्षेत राज्यात तब्बल ९४ हजार ४०० विद्यार्थी मराठी विषयात अनुत्तीर्ण होतात, ही निश्चितच चिंतेची बाब आहे. ज्या मातृभाषेत आपण वावरतो, त्या मराठी विषयाला इंग्रजी आणि गणिताइतकेच महत्त्व दिले पाहिजे. महाराष्ट्रातील मराठी विषयात एकही विद्यार्थी नापास होऊ नये, यासाठीचा हा उपक्रम सुरू केला आहे. 'मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतील ४० शाळांमध्ये तसेच बीड शहरातील सात शाळांमध्ये हा विशेष उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती आ. काळे यांनी दिली. पाठ्यपुस्तकातील लेखकाला प्रत्यक्ष भेटण्याची संधी विद्यार्थ्यांसाठी आयुष्यभरासाठी अविस्मरणीय आठवण ठरेल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी आ. काळे यांनी शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवरही भाष्य केले. जुनी पेन्शन योजना, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा, अनुदानाचे पुढील टप्पे तसेच शाळांचे डिजिटलायझेशन या विषयांवर शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकांना अध्यापनाशिवाय इतर अशैक्षणिक कामांपासून मुक्त करण्यासाठी शिक्षणमंत्र्यांसोबत बैठक झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यशवंत विद्यालयाच्या विकासासाठी यापूर्वी संगणक व शंभर बेंचसाठी पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली असून, भविष्यात विद्यालय डिजिटल करण्यासाठीही प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. शेवटी बोलताना शिक्षण माणसाला स्वतःच्या पायावरती उभं करण्याचे काम करतंय. शिक्षण हे तुमच्या आमच्या जगण्याचं साधन आहे, आपल्या जीवनामध्ये भरारी देण्याचं काम करतंय. त्यामुळे चांगलं शिका, चांगला अभ्यास करा, मेहनत करा, नेहमी खरं बोला आणि शाळेत रोज उपस्थित राहा असं आवाहन करत विद्यार्थ्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शेळके सर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लेखकाची प्रत्यक्ष भेट, कथा-कथन आणि प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे यशवंत विद्यालयात 'कौतुकाची थाप' हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी, संस्मरणीय आणि प्रेरणादायी ठरला.

शाहीर शरद यादव यांचा वाई पंचायत समितीतफे सत्कार



वाई : महाराष्ट्र राज्य जवाहर बाल भवन, मुंबई येथे झालेल्या 'शिक्षण संवाद-२०२६' कार्यशाळेत जिल्हा परिषद शाळा नागेवाडीचे शिक्षक तथा शाहीर शरद यादव यांनी साक्षरतेवर प्रभावी पोवाडा सादर केला. त्यांच्या सादरीकरणाचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्यासह प्रधान सचिव दे.ओल, बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक, एससीईआरटीचे संचालक वसेकर आदी मान्यवरांनी कौतुक केले.

सातारा जिल्ह्यातून शाहिरी पोवाडा विभागासाठी यादव यांची एकमेव निवड झाली होती. पोवाडा हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट व्हावा, अशी भूमिकाही त्यांनी मांडली. या निवडीबद्दल वाई पंचायत समितीच्या वतीने सभापती विक्रांत डोंगरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी

कार्यक्रमास उपसभापती वर्षाताई जगताप, पंचायत समिती सदस्य स्वप्नील गायकवाड, शैलेश सपकाळ, राणी पवार, वर्षाताई फरांदे, सचिन भोसले, गटविकास अधिकारी नारायण घोलप, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रभाकर जाधव, गटशिक्षणाधिकारी हर्षवर्धन मोरे, विस्तार अधिकारी साईनाथ बाळेकर, केंद्रप्रमुख तसेच पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कै. विकी तुकाराम साळुंखे यांच्या स्मरणार्थ मानाचा गणपती मंडळातफे वृक्षारोपण



वाई : सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये नेहमीच अग्रेसर असलेल्या मानाचा गणपती मंडळातफे दिवंगत सभासद कै. विकी तुकाराम साळुंखे यांच्या स्मरणार्थ शहरातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. पावसाळ्यात लावलेली झाडे जोमाने वाढतात, या संकल्पनेतून मंडळाने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हा उपक्रम राबविला. ब्राह्मणशाही ग्रामीण रुग्णालय परिसर, मानाचा गणपती मंदिर परिसर, नगरपालिका शाळा क्रमांक ७ तसेच फुलेनगर परिसरात बहावा, सोनचाफा, जांभूळ, आवळा, चिंच, ताम्हण, मधुकामिनी, रातराणी आदी वृक्षांची लागवड करण्यात आली.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी काही ठिकाणी झाडे थेट जमिनीत न लावता मोठ्या ड्रम्सचा कुंडी म्हणून वापर करण्यात आला. त्यामुळे झाडांचे संरक्षण होण्यासोबतच रस्तेही मोकळे राहणार आहेत.

'केवळ झाडे लावणे नव्हे, तर ती जगवणे हीच खरी गरज आहे,' हा संदेश देत मानाचा गणपती मंडळाच्या सर्व सभासदांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उपक्रम यशस्वी केला.

सातारा जिल्हास्तरीय संविधान संरक्षण विचार मंचची स्थापना होणार !



अनिल वीर

सातारा : आंबेडकरद्वेषी व दुटप्पी प्रवृत्तींना संविधानवादी उत्तर देण्यासाठी, जिल्हास्तरीय संविधान संरक्षण विचार मंचची लवकरच स्थापना करण्यात येणार आहे.

१ ऑगस्ट रोजी अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त घडलेल्या घटनांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निळ्या झेंड्याला विरोध झाल्याच्या प्रकारामुळे संविधानवादी समाजामध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. महापुरुषांच्या विचारांचा सन्मान करण्याऐवजी द्वेषाचे वातावरण निर्माण करणाऱ्या तथाकथित पुढाऱ्यांचा संविधान संरक्षण विचार मंच, सातारा जिल्हा तीव्र निषेध करीत आहे. आज समाजात काही दुटप्पी आणि संधीसाधू प्रवृत्ती वाढताना दिसत आहेत. सार्वजनिक व्यासपीठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदो-उदो करणारे तसेच त्यांच्या विचारांची स्तुती करणारे हेच लोक आपल्या बंदिस्त बैठकीत किंवा जातीय राजकारणात बाबासाहेबांविषयी अवमानकारक भाषा वापरतात. शिवाय, द्वेषही पसरवतात. अशा दुटप्पी, संविधानविरोधी आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींना जनता ओळखून त्यांना योग्य उत्तर देण्याची वेळ आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, भारतीय संविधान आणि निळा झेंडा हे समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे प्रतीक आहेत. त्यामुळे निळ्या झेंड्याला विरोध करणे किंवा बाबासाहेबांविषयी द्वेषाची भावना पसरवणे, हे संविधानाच्या आत्म्याविरुद्ध आहे. अशा मानसिकतेला संविधानवादी समाज कधीही स्वीकारणार नाही. याच पार्श्वभूमीवर संविधानवादी, समतावादी आणि लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणाऱ्या सर्व नागरिकांना एकत्र आणण्यासाठी जिल्ह्यास्तरीय संविधान संरक्षण विचार मंचच्या माध्यमातून भीमाच्या निळ्या सैनिकांची संघटित, शिस्तबद्ध आणि संविधाननिष्ठ फौज उभी करून संविधान, सामाजिक न्याय, बंधुता आणि महापुरुषांच्या विचारांचे संरक्षणासाठी लोकशाही मार्गाने जनजागृती करण्यात येणार आहे. कायदेशीर लढे आणि संघटनात्मक कार्य करण्यात येणार आहेत. तेव्हा संविधानावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला या चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. बाबासाहेबांचे नाव घेऊन राजकारण करणाऱ्या पण त्यांच्या विचारांशी प्रतारणा करणाऱ्या दुटप्पी प्रवृत्तींचा पर्दाफाश करून संविधान, समता आणि सामाजिक सलोखा जपण्यासाठी आता संविधानवादी शक्तींनी एकजूट होणे काळाची गरज आहे. अशी माहीती निमंत्रक दादासाहेब ओव्हाळ यांनी दिली आहे.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या कन्या शकुंतलाबाई सपताल यांच्या निधनाबद्दल आदरांजलीन!



सातारा : लोकशाहीर कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांच्या द्वितीय कन्या शकुंतला अजित सपताल यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. ब्रेन स्ट्रोक झाल्यानंतर त्यांच्यावर नालासोपारा येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. अलीकडे त्या मुलगा प्रशांत यांच्याकडे नालासोपारा येथे वास्तव्यास होत्या.

त्यांच्या पार्थिवावर नालासोपारा येथे जवळच्या नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात संजय, राजेश, प्रशांत ही मुले, नंदिनी ही मुलगी तसेच नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा विवाह इस्लामपूर येथील अजित सपताल यांच्याशी झाला होता.

शकुंतलाबाई यांनी बालपणापासून कम्युनिस्ट पक्षाच्या बाल संघ आणि सांस्कृतिक कला पथकात सक्रिय सहभाग घेतला होता. जेष्ठ भगिनी शांताबाई, रोझा डांगे, कमल व सत्यरेज मोरे, प्रभाकर मिरजकर, सुमन मोकाशी (संझगिरी) आदींसह त्यांनी सांस्कृतिक चळवळीत काम केले. आई जयवंताबाई साठे यांच्या समवेत पक्षाच्या मुखपत्रांच्या वितरणातही त्या आघाडीवर होत्या. कॉम्रेड अण्णा भाऊ साठे भूमिगत असताना पोलिसांचा ससेमिरा चुकवत त्यांच्यापर्यंत पक्षाचे साहित्य व पत्रके पोहोचविण्याचे धाडसी कामही त्यांनी केले. अण्णा भाऊ साठे यांच्या कथा व कादंबऱ्यांच्या त्या प्रथम वाचक होत्या. त्यांच्या हस्तलिखितांमध्ये आवश्यक दुरुस्त्या करण्याचे कामही त्या करत असत. साहित्यिकी विशेष आवड असलेल्या शकुंतलाबाईंनी अण्णा भाऊ साठे यांच्या निधनानंतर त्यांच्या आठवणींवर आधारित लेख विविध दिवाळी अंकांत लिहिले. विशेषतः 'फकिरा' कादंबरीच्या निर्मितीशी संबंधित त्यांनी मांडलेल्या आठवणींना विशेष महत्त्व प्राप्त झाले. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य आणि राजकीय कार्याची त्यांना सखोल जाण होती. अण्णा भाऊंनी आपले एक पुस्तक शकुंतलाबाई आणि शांताबाई या कन्यांना अर्पण केले होते.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक जीवनाच्या अखेरच्या साक्षीदार म्हणून शकुंतलाबाई यांचे स्थान महत्त्वाचे मानले जाते.

जनवादी लेखक संघ, प्रगतिशील लेखक संघ, लोक सांस्कृतिक मंच, विद्रोही सांस्कृतिक चळवळ तसेच विविध डाव्या व पुरोगामी संघटनांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत त्यांना क्रांतिकारी अभिवादन केले आहे. सातारा येथेही अनिल वीर, शिरीष जंगम व मित्रपरिवारातर्फे आदरांजली अर्पण करण्यात आली.

दुरुस्तीनंतरही पुन्हा पाणी गळती सुरू; लाखो लिटर पाणी वाया !



अनिल वीर

सातारा : येथील पूजा कॉम्प्लेक्स परिसरातील सैनिक कार केअर अँण्ड ॲक्सेसरीज' आणि त्यांच्या वॉशिंग सेंटरजवळ पुन्हा एकदा मोठी पाणी गळती सुरू झाली असून लाखो लिटर शुद्ध पाणी रस्त्यावर वाहून जात आहे. प्रशासनाच्या निकृष्ट कामाचा फटका पुन्हा एकदा नागरिकांना बसत आहे.

सदरच्या ठिकाणी पापूर्वीही पाण्याची गळती होत होती. त्यावर प्रशासनाकडून १७ जानेवारी २०२६ रोजी दुरुस्तीचे काम करण्यात आले होते. मात्र, हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे आता उघड झाले आहे. अवघ्या काही महिन्यांतच त्याच ठिकाणी पुन्हा मोठी गळती सुरू झाली आहे. गळतीमुळे रस्त्यावर पाण्याचे डबके साचले आहे.

सर्वत्र चिखलाचे आणि पाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांना ये-जा करताना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. भविष्यातील पाणीटंचाईचे संकट उभे असताना, दुसरीकडे अशा निष्काळजीपणामुळे लाखो लिटर पिण्याचे पाणी गटारात आणि रस्त्यावर वाहून जात आहे. संबंधित पाणीपुरवठा विभाग आणि प्रशासनाने या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घ्यावी. तसेच जानेवारी महिन्यात ज्या कंत्राटदाराने हे काम केले होते, त्याच्यावर कारवाई करून ही पाणी गळती कायमस्वरूपी थांबवावी. अशी संतप्त मागणी स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून केली जात आहे.

तातडीने उपाय योजना न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांचा तोंडाला काळे फासले जाईल. असा गर्भित इशारा रिपाई (आंबेडकर) या पक्षातर्फे देण्यात आला आहे. यासंबंधीचे निवेदन महाराष्ट्र प्राधिकरणला देण्यात आले आहे.

यावेळी भगवान कदम, रॅकेशबजाधव, दत्ता साळुंखे, धनाजी गायकवाड, बाबा घोडेस्वार, सागर गरड, अहमद मुलाणी, उमेश गायकवाड, योगेश माने, रामभाऊ मदाळे, राजेंद्र ओव्हाळ, राज चव्हाण आदी कार्यकर्ते उपस्थीत होते.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे आपत्तीपासून सतर्कतेसाठी १६९८ अलर्ट जारी

अतिवृष्टी व पुराच्या घटनांमध्ये नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

मुंबई :- राज्यात नैसर्गिक आपत्ती व दुर्घटनांमुळे झालेल्या घटनामुळे मानवी जीवितहानीपासून बचावासाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या माध्यमातून जानेवारी २०२६ पासून आतापर्यंत १६९८ अलर्ट पाठविण्यात आले. तसेच वीज पडणे, अतिवृष्टी आणि भूस्खलनासंदर्भातील २८५ अलर्ट जारी करण्यात आले आहेत, अशी माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी केंद्र आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची २३ पथके कार्यरत

विभागामार्फत देण्यात आलेल्या माहितीनुसार हवामान खात्याकडून प्राप्त होणाऱ्या पूर्वसूचना आणि रिअल-टाईम अलर्टच्या आधारे स्थानिक प्रशासनाला तात्काळ सूचना देण्यात आल्या तसेच नागरिकांना सतर्क करण्यासाठी इशारे देण्यात आले. राज्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थितीचा सामना करताना नागरिकांचा जीवित हानीपासून बचाव करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) यांची एकूण २३ पथके विविध संवेदनशील जिल्ह्यांमध्ये तैनात करण्यात आली आहेत. यामध्ये एनडीआरएफ १७ आणि ६ पथकांचा समावेश असून, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित बचाव व मदतकार्य करता आले आहे.

सर्वाधिक ४ एनडीआरएफ पथके मुंबईत तैनात करण्यात आली आहेत. याशिवाय पालघरमध्ये १, नागपूरमध्ये २, पुणे (मुख्यालयासह) येथे २, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर येथे प्रत्येकी १ एनडीआरएफ पथक तैनात आहे. एसडीआरएफची ६ पथके अनुक्रमे धुळे (मुख्यालय) येथे २, नागपूर (मुख्यालय) येथे २, नांदेड येथे १ आणि गडचिरोली येथे १ तैनात करण्यात आली आहेत. शासनाने जिल्हा प्रशासन, आपत्ती प्रतिसाद दल आणि स्थानिक यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक सर्व उपाययोजना केल्या जात आहे.

जून व जुलै महिन्यात ८४ जीवित हानी

वीज पडणे, भिंत कोसळणे, झाड पडणे, पुराच्या पाण्यात वाहून जाणे आणि दरड कोसळणे या घटनांमध्ये जून व जुलै महिन्यात जीवितहानीच्या ८४ घटना घडल्या आहेत. यामुळे यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी व पुरापासून बचाव करताना विविध जिल्ह्यात बचाव व मदत कार्य करण्यात आले. यामुळे सरासरी पेक्षा जास्त पाऊस होत असून देखील जीवित व पशुधनाची हानी कमी झाली आहे. जानेवारी ते जुलै २०२६ या कालावधीत विविध दुर्घटनांमध्ये १३७ नागरिकांचा मृत्यू झाला असून, ५०५ पशुधनाचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. पालघर, पुणे, ठाणे, रायगड, नागपूर, सिंधुदुर्ग गडचिरोली, भंडारा यासह विविध जिल्ह्यांतील पूरपरिस्थितीत एसडीआरएफ, जिल्हा प्रशासन आणि स्थानिक यंत्रणांनी तातडीने बचावकार्य करून अडकलेल्या नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविले.

७ ऑगस्ट पर्यंत राज्यात पावसाचा जोर कायम

भारतीय हवामान विभागाच्या ७ ऑगस्ट २०२६ पर्यंतच्या अंदाजानुसार राज्यातील विविध भागांत पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज आहे. विदर्भातील जिल्ह्यांत सुरुवातीच्या दिवसांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यतासह पाऊस तर मुंबई महानगर, कोकण घाट विभागात, मराठवाडा व मध्य महाराष्ट्रातील पावसाची शक्यता असून नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी.

राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे. वीजांच्या कडकडाटाच्या वेळी सुरक्षित ठिकाणी थांबावे आणि आवश्यक नसल्यास पूरप्रवण व धोकादायक भागात जाणे टाळावे.

वाई भाजी मंडईच्या आधुनिकीकरणाला अखेर हिरवा कंदील



वाई : वाई शहराच्या मध्यवर्ती भागातील महात्मा फुले भाजी मंडईच्या बहुप्रतीक्षित आधुनिकीकरणाच्या कामाला अखेर सुरुवात झाली असून, ५८ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन बुधवारी (दि. ५) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या कामामुळे मंडईचे संपूर्ण रूप पालटणार असून व्यापारी, ग्राहक आणि नागरिकांना आधुनिक व दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहेत.

रस्ते अनुदान योजनेतून मंजूर झालेल्या ५८ लाख रुपयांच्या निधीतून भाजी मंडईचे नूतनीकरण, वाढीव भागाचे सिमेंट काँक्रीटीकरण, भाजी विक्रेत्यांसाठी शेड, नवीन गाळे, कट्टे, लोखंडी जाळ्या, पांढरे पट्टे तसेच परिसराचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे.

या विकासकामासाठी महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री ना. जयकुमार गोरे, विधान परिषद सदस्य धैर्यशील कदम यांच्या सहकार्यातून तसेच लोकनियुक्त नगराध्यक्ष अनिल सावंत यांच्या विशेष प्रयत्नातून निधी उपलब्ध झाला. वाई नगरपरिषदेतील सर्व नगरसेवकांच्या सहकार्याने हा प्रकल्प मार्गी लागला.

भूमिपूजन कार्यक्रमास नगरपरिषदेचे पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी, व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्या महात्मा फुले भाजी मंडईमध्ये सुमारे १०० ते

५८ लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन; ३०० हून अधिक व्यापाऱ्यांना मिळणार आधुनिक सुविधा

१५० व्यापारी व्यवसाय करतात. जागेअभावी अनेकांना रस्त्यावर किंवा अपुऱ्या सुविधांमध्ये व्यवसाय करावा लागत होता. नव्या आराखड्यानुसार ३०० ते ३२५ व्यापाऱ्यांना नियोजनबद्ध व हक्काची जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांची गैरसोय दूर होण्यावरोबरच ग्राहकांनाही स्वच्छ, सुरक्षित आणि प्रशस्त बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

मंडई परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठीही विशेष नियोजन करण्यात आले आहे. अतिक्रमण हटवून दोन्ही बाजूंनी रस्ते मोकळे करण्यात येणार असल्याने रिक्षा, दुचाकी, चारचाकी तसेच आपत्कालीन वाहनांची वाहतूक सुरळीत होईल. ज्येष्ठ नागरिक, महिला व ग्राहकांना बाजारात ये-जा करणे अधिक सोयीचे होणार आहे.

नवीन प्रकल्पात स्वच्छतेलाही विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. कचरा व्यवस्थापन, स्वच्छ परिसर आणि आरोग्यदायी वातावरणात भाजीपाल्याची विक्री होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत.

दरम्यान, नूतनीकरणाच्या काळात व्यापाऱ्यांचा व्यवसाय बंद पडू नये, यासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले असून आवश्यकतेनुसार तात्पुरती पर्यायी व्यवस्था करून व्यवसाय सुरू ठेवण्यात येणार आहे.

यावेळी नगराध्यक्ष अनिल सावंत यांनी व्यापाऱ्यांना विकासकामात सहकार्य करण्याचे आवाहन केले. अतिक्रमण स्वेच्छेने हटवावे, समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणाव्यात आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात गोविंद इथापे यांनी वाई शहराला आधुनिक आणि नियोजनबद्ध 'डोंगम सिटी' बनविण्याचा दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगितले. संतोष जमदाडे यांनी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले भाजी मंडई नूतनीकरणाचे स्वप्न आता साकार होत असल्याचा आनंद व्यक्त केला. आरोग्य सभापती केतकी पाटणे-मोरे यांनीही नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी नगरपरिषद सातत्याने प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही दिली.

यावेळी शहराच्या व्यापक विकास आराखड्यांतर्गत भुयारी गटार योजना, नदी संवर्धन, हद्दवाढ आणि वाहतूक सुधारणा यांसारखे महत्त्वाचे प्रकल्पही लवकरच मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कंत्राटदाराच्या हलगर्जीपणाचा फटका; विद्यार्थ्यांनी भरलेला ऑटो पलटी

नववीच्या विद्यार्थ्याचा हात फ्रॅक्चर; किनकर कॉलेजजवळील अपघाताने संतापाची लाट

सेलू/ प्रशांत झाडे

सुरगाव-सेलू मार्गावरील अपूर्ण रस्त्याचे काम आणि रस्त्यावर बेदरकारपणे टाकून ठेवलेली सैल गिट्टी अखेर जीवघेणी ठरली. मंगळवारी सकाळी किनकर कॉलेजजवळील पुलावर शाळकरी विद्यार्थ्यांनी भरलेला प्रवासी ऑटो गिट्टीत घसरून पलटी झाल्याने नववीतील विद्यार्थ्याचा हात फ्रॅक्चर झाला, तर आणखी एका विद्यार्थ्यास गंभीर दुखापत झाली. चार ते पाच विद्यार्थी किरकोळ जखमी झाले असून या घटनेमुळे संबंधित कंत्राटदाराच्या निष्काळजी कारभाराविरोधात नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरगाव येथील गोलू कंगाले हे एमएच-३१ सीव्ही-७४०१ क्रमांकाच्या ऑटोमधून दीपचंद चौधरी विद्यालयातील ११ विद्यार्थ्यांना घेऊन सेलूकडे



येत होते. सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास किनकर कॉलेजजवळील पुलावर रस्त्यावर साचलेल्या गिट्टीत ऑटोचे पुढील चाक रुतल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ऑटो रस्त्यावर पलटी झाला.

या अपघातात आदित्य प्रशांत पाटील (वय १५, रा. सुरगाव) या विद्यार्थ्याचा हात फ्रॅक्चर झाला. त्याला तत्काळ सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्या हाताच्या हाडाचे दोन तुकडे झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. श्रेयस विनोद पुनवटकर (रा. सुरगाव) याच्या



पायात गिट्टीचे धारदार तुकडे घुसल्याने त्यालाही गंभीर दुखापत झाली. अन्य जखमी विद्यार्थ्यांवर सेलू ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले.

अपघातानंतर संबंधित कंत्राटदाराने घटनास्थळी धाईधाईने वरीक चुरी टाकून परिस्थिती निर्यंत्रणात आणण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा परिसरात आहे. मात्र, अपघात घडल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी कामाच्या सुरुवातीपासूनच आवश्यक सुरक्षिततेची खबरदारी घेतली असती, तर हा अपघात टाळता आला असता, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

सुरगाव-सेलू मार्गावरील रस्त्याचे काम अनेक दिवसांपासून संथ गतीने सुरू असून सैल गिट्टीमुळे वाहनचालकांचा जीव धोक्यात आला आहे. वारंवार अपघात होऊनही संबंधित यंत्रणा आणि कंत्राटदाराकडून कोणतीही प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नाही.

विशेष म्हणजे, याच दिवशी सकाळी पावर हाऊसच्या प्रवेशद्वारासमोर गिट्टीवर घसरून एका महिला कर्मचाऱ्याची मोपेडस्वह पडून दुखापत झाल्याची घटना घडली. एका दिवसात घडलेल्या या दोन अपघातांनी रस्त्यावरील निष्काळजीपणाचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.

> स्थानिक नागरिकांच्या मते 'रस्त्यावरील सैल गिट्टी तातडीने हटवून सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था करावी, अपूर्ण काम त्वरित पूर्ण करावे आणि निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. अन्यथा भविष्यात आणखी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे.'

कारंजा तहसील कार्यालयात सामाजिक वनीकरण विभागातर्फे रोपे विक्री स्टॉलचे उद्घाटन; वृक्षारोपणही संपन्न



कारंजा : सामाजिक वनीकरण विभाग, कारंजा यांच्या वतीने वनमहोत्सवानिमित्त आज, ५ ऑगस्ट २०२६ रोजी तहसील कार्यालय परिसरात रोपे विक्री स्टॉल सुरू करण्यात आला आहे. या स्टॉलचे उद्घाटन नायब तहसीलदार आत्माम यांच्या हस्ते पार पडले.

?उद्घाटनानंतर उपकोषागार अधिकारी योगेश वागुळकर आणि सामाजिक वनीकरणचे वनक्षेत्रपाल आर. एस. उमक यांच्या हस्ते तहसील परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाला वनरक्षक प्रकाश देशभ्रतार, गोविंद सोत्रर, वकील ॲड. गाखरे, कनिष्ठ सहाय्यक यश शेंडे, उपकोषागार कार्यालयाचे श्रीनिवास मुंडे, गणेश माहुरिया, गणेश केवट, राजू काळे यांच्यासह स्थानिक पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

?या स्टॉलवर फणस, आंबा, जांभूळ, कवठ, सीताफळ, कडुनिंब, आवळा, सागा, बांबू, चिंच, बेल, शेंदूर आणि करंज यांसारखी विविध प्रकारची फळझाडे व झाडांची रोपे अत्यंत सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कारंजा तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी व शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी आर. एस. उमक यांनी केले आहे.

एमपीएससीकडून राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ साठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ साठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ दिली आहे. उमेदवारांच्या मागणीचा विचार करून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १० ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत, तर ऑनलाइन परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत १३ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे.

या परीक्षेद्वारे एकूण ५,७०७ पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून, पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकानुसार विविध मागण्यांचा समावेश करून पदसंख्या वाढविण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नसून, त्यांनी 'ईर्ड्मल्ल्' या पर्यायातून संबंधित माहिती अद्ययावत करावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. तसेच, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी नियुक्तीपूर्वी करण्यात येणार असून, पात्रता सिद्ध न झाल्यास नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

असेही आयोगाने जाहिरातीत नमूद केले आहे. याबाबतचे शुद्धीपत्रक महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असल्याचे आयोगामार्फत कळविण्यात आले आहे.

महानमधील आयटी कर्मचाऱ्यांची स्मार्ट व शाश्वत प्रवासासाठी 'आपली बस'ला पसंती

नागपूर/ दिलीप येवले

नागपूरमधील मिहान (एसईझेड) परिसर हा वेगाने विकसित होणारा आयटी आणि व्यावसायिक केंद्र बनत आहे. त्यामुळे या परिसरात काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांसाठी विश्वासार्ह आणि सोयीस्कर सार्वजनिक वाहतूक अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. ही गरज ओळखून अनेक नामांकित कंपन्यांनी महा मेट्रोशी एकात्मिक असलेल्या 'आपली बस' सेवेला आपल्या कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन प्रवाससाठी प्राधान्य दिले आहे.

टीसीएस, एचसीएल टेक्नॉलॉजीज, इन्फोसिस, टेक महिंद्रा, स्मार्ट डेटा, केसी ओव्हरसीज एज्युकेशन, नॅशनल कॉन्सर इन्स्टिट्यूट (एनइ), एम्स नागपूर, टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम्स (मिहान), मास्टरसॉफ्ट, हल्दीराम, डसॉल्ट रिलायन्स एरोस्पेस लिमिटेड (डॅ॑ऍ, ॅ॑ऍ॑ए, ॅ॑ऍ॑ई), ल्युपिन तसेच इतर अनेक कंपन्यांचे कर्मचारी आपली बस सेवेचा नियमित वापर करत आहेत. महा मेट्रो आणि शहर बस सेवेमधील एकात्मिक सुविधेमुळे कर्मचाऱ्यांना सुरक्षित, किफायतशीर, वेळेवर आणि आरामदायी प्रवासाचा लाभ मिळत आहे.

सध्या आपली बस सेवेकडे ७३० बसांचा ताफा असून १२० हून अधिक मुख्य मार्ग आणि २०० पेक्षा अधिक उपमार्गांवर बस सेवा सुरू आहे.



यावेळी मान्यवरांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरव करून त्यांचे अभिनंदन केले. नागपूर महानगरपालिका परिवहन विभाग आणि चलो मोबिलिटी यांच्या संयुक्त प्रयत्नातून नागपूरमध्ये अधिक स्मार्ट, पर्यावरणपूरक आणि डिजिटल सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले.

- परिवहन विभाग, नागपूर महानगरपालिका

ही सेवा नागपूर शहरासह ग्रामीण भागालाही जोडते.

ऑगस्ट २०२६ (आजपर्यंत) या कालावधीत दररोज सरासरी १,७३,१०९ प्रवाशांनी आपली बससचा प्रवास केला आहे. त्यापैकी ६२,५९३ प्रवाशांनी ळ्ह्ल्ल, मोबाईल पास, चलो कार्ड आणि ऊ्ल्ल्ल तिकीट सेवा अशा डिजिटल माध्यमांचा वापर करून प्रवास केला आहे.

३ ऑगस्ट २०२६ रोजी आपली बसने आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला. त्या दिवशी २,१२,८५६ प्रवाशांनी आपली बस सेवेद्वारे प्रवास करून आजपर्यंतची सर्वाधिक दैनिक प्रवासी संख्या नोंदवली.

शहर बस सेवा, महा मेट्रोशी जोडलेली फीडर सेवा आणि डिजिटल तिकीट प्रणालीमुळे सार्वजनिक वाहतूक ही आता केवळ पर्याय सेवा न राहता नागपूरमधील नोकरदार, विद्यार्थी आणि नागरिकांची पसंतीची प्रवास व्यवस्था बनत आहे. यामुळे प्रवास अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि कॅशलेस होत असून पर्यावरणपूरक वाहतुकीलाही प्रोत्साहन मिळत आहे.

परिवहन समिती अध्यक्षा मंगला खेकरे, आयुक्त विपीन इटनकर, विशाल कनोजिया (प्रकल्प प्रमुख, चलो मोबिलिटी), सचिन गडबैल (ऑपरेशन्स मॅनेजर, चलो मोबिलिटी), सुमित देशमुख (ऑपरेशन्स मॅनेजर, चलो मोबिलिटी) आणि मयूर कुमारले (मार्केटिंग मॅनेजर, चलो मोबिलिटी) यांच्या मार्गदर्शनाखाली आपली बस सेवा अधिक स्मार्ट, आधुनिक आणि डिजिटल सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करत आहे.

या ऐतिहासिक यशानिमित्त उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती अध्यक्षा शिवानी दाणी-वाखारे, परिवहन समिती अध्यक्षा मंगला खेकरे, उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक मिलिंद मेश्राम, प्रशासकीय अधिकारी (परिवहन) योगेश लुंगे, राजीव घाटोळे (ऑपरेशन्स मॅनेजर) तसेच गजानन नागुलवार (ॲडमिन मॅनेजर) उपस्थित होते.

भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी जावेद सय्यद यांची नियुक्ती,



सेलू/ प्रशांत झाडे

भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्यांक मोर्चाच्या वर्धा जिल्हा कार्यकारिणीत सेलू येथील जावेद अयुब अली सय्यद यांची जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या दीर्घकालीन पक्षनिष्ठा, सातत्यपूर्ण संघटनात्मक कार्य आणि समर्पित योगदानाची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

'दीर्घकालीन पक्षनिष्ठेला मिळाली पावती;'

जीवन सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी पक्षविस्तारासाठी उल्लेखनीय योगदान दिले.

भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय गाते यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष कौसर अंजुम शेख यांनी नुकतीच जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली. यामध्ये सेलू येथील जावेद अली ट्रेडिंग कंपनीचे संचालक जावेद अयुब अली सय्यद यांची जिल्हा उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

जावेद सय्यद हे पक्षाच्या स्थापनेच्या सुरुवातीच्या काळापासून भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेशी निष्ठावान राहून कार्यरत आहेत. पक्षाची सत्ता नसतानाही तसेच स्थानिक पातळीवर पक्षाचे प्रतिनिधित्व मर्यादित असलेल्या काळातत्यांनी संघटन बळकट करण्यासाठी सातत्याने परिश्रम घेतले. सेलू येथील भाजपचे ज्येष्ठ समन्वयक शंडे, उपकोषागार कार्यालयाचे श्रीनिवास मुंडे, गणेश माहुरिया, गणेश केवट, राजू काळे यांच्यासह स्थानिक पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

?या स्टॉलवर फणस, आंबा, जांभूळ, कवठ, सीताफळ, कडुनिंब, आवळा, सागा, बांबू, चिंच, बेल, शेंदूर आणि करंज यांसारखी विविध प्रकारची फळझाडे व झाडांची रोपे अत्यंत सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कारंजा तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी व शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी आर. एस. उमक यांनी केले आहे.

समृद्धी नगरात नगराध्यक्षांनी केली लाईटची व्यवस्था .!

प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या जाणून घेतल्या होत्या समस्या

देवळी (प्रतिनिधी): देवळी शहरातील डिग्डोह रस्त्यावरील समृद्धी नगर, वार्ड क्रमांक ७ मधील नागरिकांना पावसाळ्यात चिखलमय रस्त्यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचत असल्याने पादचाऱ्यांची ये-जा धोकादायक बनली होती.

या परिसरात रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नसल्याने अंधाराचे साम्राज्य पसरल्याने येथील नागरिकांना अंधुक प्रकाशामुळे दिसत नसल्याने गंभीर दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली होती.

या समस्येवर नगराध्यक्ष किरण ठाकरे यांनी ताबडतोब तोडगा काढून लाईटची व्यवस्था करून दिली असल्याने नागरिकांनी त्यांचे आभार मानलेत.

इतरही समस्यांचे लवकरच नगराध्यक्ष किरण ठाकरे यांनी निराकरण करण्याची अपेक्षा समृद्धी नगरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

काटोल येथील बँक ऑफ इंडिया शाखेला प्रहारचा दणका

अपमानास्पद वक्तव्याप्रकरणी शाखा व्यवस्थापक व कर्मचाऱ्याची जाहीर माफी



काटोल / प्रशांत पवार

डोंगरगाव येथील पारधी समाजातील काही महिला बचत गटाचे खाते उघडण्यासाठी काटोल येथील बँक ऑफ इंडिया शाखेत गेल्या असता, तेथील एका कर्मचाऱ्याने पारधी समाजाबाबत कथित अपमानास्पद वक्तव्य केल्याने महिलांच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचली. या घटनेबाबत संबंधित महिलांनी प्रहार संघटनेकडे आपली कैफियत मांडली.

या तक्रारीची गंभीर दखल घेत प्रहार संघटनेचे काटोल-नरखेड विधानसभा प्रमुख दिनेश निंबाळकर, अजय पांडे, अभिनय सातपुते तसेच पारधी समाजाच्या प्रतिनिधी नेहा राजपूत यांच्या नेतृत्वाखाली असंख्य महिलांनी बँकेत जाऊन तीव्र निषेध नोंदविला. यावेळी उपस्थित महिलांनी बँकेतील काही कर्मचाऱ्यांकडून मिळणाऱ्या कथित गैरवर्तनाविषयीही आपले अनुभव मांडले.

यावेळी प्रहार संघटनेचे नेते दिनेश निंबाळकर यांनी शाखा व्यवस्थापकांना घटनेचे गांभीर्य लक्षात आणून देत भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही, याची खबरदारी घेण्याची सूचना केली. त्यानंतर शाखा व्यवस्थापक आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी उपस्थित महिलांची जाहीर माफी मागितली. तसेच यापुढे कोणत्याही ग्राहकाशी जाती, समाज किंवा इतर कोणत्याही आधारावर भेदभावपूर्ण किंवा अपमानास्पद वर्तन होणार नाही, अशी ग्वाही दिली.

प्रकरण निकाली काढताना संबंधित सर्व महिलांची बचत गटाची खाती तात्काळ उघडून देण्यात आली. या घटनेनंतर महिलांनी समाधान व्यक्त केले असून, सामाजिक सन्मान आणि समान वागणूक मिळवून देण्यासाठी प्रहार संघटनेने घेतलेल्या भूमिकेचे उपस्थितांनी स्वागत केले.

ऑनलाईन फूड डिलिव्हरीमुळे अन्न आणि आरोग्याचे नाते धोक्यात.!



आरती कारंजेकर

देवळी : बदलत्या जीवनशैलीमुळे आणि ऑनलाईन फूड डिलिव्हरीच्या वाढत्या वापरामुळे पारंपरिक खाद्य संस्कृती मागे पडत चालली आहे. अन्नातील सात्विकता आणि आईच्या हाताची चव हरवल्याने फास्ट फूड तसेच प्रिझर्व्हेटिव्हयुक्त अन्नाचे सेवन वाढले असून, त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. ओबेसिटी, मधुमेह आणि उच्च रक्तदाबासारखे गंभीर आजार वाढीस लागत असून आहाराच्या बाबतीत स्वयंशिस्त पाळणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

सत्तरच्या दशकात प्रत्येक घरात

बदलत्या आहार पद्धतीत कुठे हरवली आईच्या हाताची चव ?

ऐकायला मिळणारा चुलीचा संवाद आजच्या धावपळीच्या युगात मागे पडला आहे. काळाच्या ओघात चुलीची जागा गॅसने घेतली आणि स्वयंपाकघरातील संघर्ष संपला. पुढे जागतिकीकरणाच्या प्रवाहात 'दोन मिनिटांत नुडल्स' सारख्या पदार्थांनी खाद्यसंस्कृतीत मोठी क्रांती घडवून आणली. हळूहळू बर्गर, फ्रेंच फ्राईज आणि पिझ्झा यांसारख्या 'फास्ट फूड'ची जागा वाढली असून, सुट्टीच्या दिवशी हे पदार्थ खाणे ही लोकांची मानसिक गरज बनली आहे.

बदलत्या जीवनशैलीमुळे पती-पत्नी दोघेही नोकरी करत असल्याने वेळेची प्रचंड ओढाताण होते. यातूनच ऑनलाईन ॲपवरून जेवण मागवण्याचे प्रमाण वाढले आहे. डब्यात बंद असलेले अन्न दारात ताटकळत राहते आणि घरी आल्यावर मायक्रोवेव्हमध्ये गरम करून जेवण उरकले जाते. पूर्वी हॉटेलमध्ये जेवणे हे प्रतिष्ठित मानले जात नसे; मात्र पुढे एकत्र कुटुंब पद्धती लयाला जाऊन विभक्त कुटुंबे रुजली आणि हॉटेलिंगचे प्रमाण वाढले. हॉटेलमधील गर्दी आणि 'वेटिंग' मुळे ऑनलाईन फूड डिलिव्हरीचा नवा ट्रेंड जन्माला आला. अन्न बनवणाऱ्या प्रक्रियेतील आपुलकी आणि प्रेमाची भावना कमी झाली असून, आईच्या हाताच्या मायेच्या स्पर्शाची जागा आता हॉटेलमधील शेफच्या व्यावसायिकतेने घेतली आहे.

आरोग्याची खरी संपत्ती ही ऑनलाईन मागवलेल्या फास्ट फूडमध्ये नसून, घरच्या सात्विक आहाराच्या संयमातच दडलेली आहे. त्यामुळे जीभेच्या क्षणिक सुखापेक्षा आरोग्याचा विचार करून आहाराबाबत वेळीच 'लक्ष्मणरेषा' आखणे हेच काळाची गरज आहे.

ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अन्नात मीठ, साखर, तेल, चीज, कृत्रिम रंग आणि प्रिझर्व्हेटिव्हजचा सढळ हस्ते वापर केला जात आहे. या अति-प्रक्रिया केलेल्या अन्नामुळे ओबेसिटी, मधुमेह आणि उच्च रक्तदाबासारख्या जीवनशैलीशी निगडित आजारांना आमंत्रण मिळत आहे.

पेसा ग्रामसभा मोबिलायझर्स कायम ठेवण्याबाबत सकारात्मक निर्णय – मंत्री जयकुमार गोरे

केंद्राच्या अंतिम निर्णयापर्यंत विद्यमान व्यवस्था कायम राहणार



मुंबई : राज्यातील पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत मानधन तत्वावर सध्या कार्यरत असलेले पेसा ग्रामसभा मोबिलायझर्स कायम ठेवण्याचे ग्रामविकास विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांनी एकत्रितपणे ठरवले आहे. या दोन्ही विभागांच्या समन्वयाने याबाबत पुन्हा केंद्र शासनास प्रस्ताव पाठवण्यात येणार असून केंद्राचा अंतिम निर्णय येईपर्यंत सध्या कार्यरत पेसा ग्रामसभा मोबिलायझर्स कायम ठेवण्यात येत असल्याचे ग्राम विकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले. पेसा मोबिलायझर्स संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक वुईके यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. बैठकीस आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, ग्रामविकास सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्यासह संबंधित अधिकारी, पेसा मोबिलायझर्स संघर्ष समिती प्रतिनिधी उपस्थित होते.

ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले की, पेसा क्षेत्रातील ग्रामसभांचे महत्व आणि त्यांचे प्रभावी कामकाज लक्षात घेऊन विद्यमान ३,००३ मोबिलायझर्सची पदसंख्या कायम ठेवण्याची विनंती करणारा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाकडे पुन्हा पाठविण्यात येणार आहे. केंद्र शासनाचा अंतिम निर्णय येईपर्यंत राज्यातील विद्यमान पेसा ग्रामसभा मोबिलायझर्स कार्यरत ठेवण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या निर्णयामुळे पेसा क्षेत्रातील ग्रामसभांचे कामकाज, जनजागृती आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी अखंडितपणे सुरू राहण्यास सहाय्य होणार आहे. त्यादृष्टीने पेसा मोबिलायझर्सना अद्यायावत प्रशिक्षण, त्यांच्या पदाची कर्तव्य व जबाबदारी याबाबत वेळोवेळी माहिती देण्यात येण्याची व्यवस्था संबंधित यंत्रणांनी करावी जेणेकरुन हे मोबिलायझर्स अधिक प्रभावीपणे काम करतील, अशा सूचना यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधितांना दिल्या.

महाराष्ट्रात पेसा (पंचायत एक्टेशन टू शेड्यूल्ड एरियास) अधिनियम १३ जिल्ह्यांतील ५९ तालुक्यांमध्ये लागू असून अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांचे सक्षमीकरण, पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामसभांचे नियमित आयोजन, जनजागृती तसेच शासनाच्या विविध योजना ग्रामसभांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ग्रामविकास विभागाने २२ जून २०१६ रोजी शासन परिपत्रक जारी केले होते. या परिपत्रकानुसार प्रत्येक पेसा ग्रामपंचायतीसाठी ग्रामसभेमार्फत एका महिला बचत गटाची निवड करून त्या गटामधून एका संपर्क व्यक्तीची पेसा ग्रामसभा मोबिलायझर म्हणून नियुक्ती करण्यात येते. तसेच, २२ जानेवारी २०१८ रोजीच्या परिपत्रकाद्वारे मोबिलायझर्सची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. २०२५-२६ पर्यंत राज्यातील प्रत्येक पेसा ग्रामपंचायतीस एक या प्रमाणे एकूण ३,००३ पेसा ग्रामसभा मोबिलायझर पदांना मंजुरी देण्यात आली होती. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या मंजूर तरतुदीनुसार मोबिलायझर्सचे मासिक मानधन २,५०० रुपयांवरून ४,००० रुपये करण्यात आले आहे.

मात्र, एप्रिल २०२६ नंतर या केंद्र पुरस्कृत योजनेला मुदतवाढ देताना केंद्र शासनाने तीन ग्रामपंचायतीच्या समूहासाठी एक मोबिलायझर या प्रमाणे पदसंख्या ३,००३ वरून १,००१ करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पंचायत राज संचालनालयामार्फत जिल्हास्तरावर आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या. या मध्ये १,००१ मोबिलायझर यांचे मानधन ग्रामविकास विभागाकडून तर उर्वरित यांचे मानधन आदिवासी विकास विभागामार्फत अदा केले जाईल. सध्या कार्यरत पेसा मोबिलायझर्स कायम ठेवण्याबाबत पुन्हा पत्रव्यवहार करण्यात येईल असे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले.



पुलगाव - आर्वी समृद्धी रोडवर अपघातानंतर कडक सुरक्षा

अपघाताच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी लावले बॅरिकेट,

विरुळ - आकाजी : पुलगाव-आर्वी समृद्धी महामार्ग इंटरचेंज जवळ काल झालेल्या भीषण अपघातानंतर आज पुलगाव पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने कडक उपाययोजना केल्या. अपघातग्रस्त ठिकाणी बॅरिकेट लावून वाहतूक नियंत्रण करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, काल संध्याकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास विरुळ येथील अक्षय किशोर उपासे हा तरुण पुलगाववरून विरुळकडे दुचाकीने येत होता. यावेळी अज्ञात वाहनाने त्याला जोरदार धडक दिली. या अपघातात अक्षय जागीच ठार झाला तर इतर २ जण जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच काल रात्रीच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. वंदना कारखेले यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. तसेच आज सकाळी अपर पोलीस अधीक्षक श्री. सदाशिव वाघमारे यांनी देखील घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

या अपघाताची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आज पुलगाव-आर्वी समृद्धी रोडवरील इंटरचेंज जवळ पुलगाव पोलीस व अँफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर कँपनी कडून बॅरिकेट लावण्यात आले.

अप्पर पोलीस अधीक्षक श्री. वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कारखेले यांच्या मार्गदर्शनाखाली पुलगाव पोलीस निरीक्षक श्री. सदाशिव ढाकणे यांच्या नेतृत्वात ट्राफिक पोलीस हवालदार लोमटे, मनोज बाराहाते आणि होमगार्ड शेख अनवर यांनी आज दिवसभर रस्त्यावर उभे राहून वाहनचालकांना सुरक्षित वाहतुकीबाबत सूचना दिल्या.

अपघातामुळे महामार्गावरील वेगावर नियंत्रण ठेवणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट; शिक्षणाच्या वाटचालीला नवे बळ

रोटरी क्लब ऑफ नागपूर व्हिजनच्या हस्ते साहित्य व शैक्षणिक किटचे वितरण; विद्यार्थ्यांना शिक्षण, स्वावलंबन व आत्मविश्वासाचा संदेश



गुमथी/ दिलीप येवले

दिव्यज्योती बौद्धिक अक्षम मुला-मुलींची विशेष शाळा तसेच संत सीताराम महाराज बौद्धिक अक्षम मुला-मुलींचे निवासी कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, गुमथी ता. कामठी, जि. नागपूर येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

दिशा अभियानांतर्गत शाळेला प्राप्त झालेले शैक्षणिक अध्ययन साहित्य तसेच सी.आर.सी. केंद्र, बर्डी यांच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या शैक्षणिक किटचे वितरण रोटरी क्लब ऑफ नागपूर व्हिजनच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला अधिक चालना मिळून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब ऑफ नागपूर व्हिजनचे अध्यक्ष रोटेरियन डॉ. जुगलकिशोर अग्रवाल होते. प्रमुख पाहुणे म्हणून रोटेरियन सोहराब कांगा (माजी अध्यक्ष), रोटेरियन दिनेश नायडू, रोटेरियन योगेश पालीवाल, रोटेरियन सरिता अग्रवाल, रोटेरियन शिल्पा केळकर, रोटेरियन डॉ. नितीन घवघवे, रोटेरियन श्रीमती घवघवे आणि रोटेरियन समिता असाई उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष आशीष मोरे, शाळेचे मुख्याध्यापक पिलेश्वर मोरे तसेच व्यवस्थापकीय अधीक्षिका अंजली मोरे उपस्थित होते.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले. नियमित शिक्षण, स्वावलंबन आणि आत्मविश्वास यांच्या माध्यमातून जीवनात यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध शैक्षणिक व हस्तकला साहित्याचे कौतुक करून त्यांच्या गुणवत्तेला दाद दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लता वारजूरकर यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देणारा आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी ठरलेला हा उपक्रम सर्वांच्या कौतुकास पात्र ठरला.

दुग्धवर्धक पाककृतीतून सुदृढ मातृ आरोग्याचा संदेश

- विद्यापीठाच्या पदव्युत्तर गृह विज्ञान विभागात दुग्धवर्धक आहार विषयावर प्रदर्शन व पोस्टर स्पर्धा - विद्यार्थिनींनी बनविलेल्या पाककृतींचे मा. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्याकडून कौतुक



नागपूर/ दिलीप येवले

नाविन्यपूर्ण १०२ दुग्धवर्धक पाककृती बनवीत विद्यार्थ्यांनी सुदृढ मातृ आरोग्याचा संदेश दिला आहे. 'आईचे पोषण, दुधाचे संवर्धन, उज्वल भविष्याचे संगोपन' या संकल्पनेवर आधारित जागतिक स्तनपान सप्ताह २०२६ निमित्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर गृह विज्ञान विभागात दुग्धवर्धक आहार या विषयावर एक दिवसीय प्रदर्शन व पोस्टर स्पर्धा पार पडली. गृह विज्ञान विभागात बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित स्पर्धेत विद्यार्थ्यांनी बनविलेल्या पाककृतीचे माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी विशेष कौतुक केले. दुग्धवर्धक आहार विषयावरील एक दिवसीय प्रदर्शन व पोस्टर्स स्पर्धेचे उद्घाटन माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या शुभहस्ते झाले असून यावेळी मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मंगला हिरवाडे, गृह विज्ञान विभाग प्रमुख डॉ. वंदना धवड, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. वर्षा धुर्वे, डॉ. स्मिता आचार्य, डॉ. शुभदा जांभुळकर, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. समित माहोरे, तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. धीरज कदम, कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. प्राजक्ता नांदे यांची यावेळी उपस्थिती होती. विद्यार्थिनींनी तयार केलेल्या नाविन्यपूर्ण १०२ दुग्धवर्धक पाककृतींची पाहणी माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी केली. विविध प्रकारच्या दुग्धवर्धक पदार्थांची पर्वणीच प्रदर्शन व पोस्टर स्पर्धेच्या निमित्ताने ठरली असल्याने माननीय कु. डॉ. मनाली क्षीरसागर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे यावेळी कौतुक केले.

स्तनदा मातांसाठी उपयुक्त अशा १०२ पाककृतींचे यावेळी सादरीकरण करण्यात आले. या पाककृती बादाम, जव, नागवेलीची पाने, काळे तीळ, सुके खोबरे, खजूर, शेवग्याची पाने, बडीशेप, मेथी, अळशी, लसूण, आले, डिंक, ओट्स, खसखस, भोपळ्याच्या बिया आणि कच्ची पपई अशा विविध १८ पारंपरिक दुग्धवर्धक अन्नपदार्थांपासून तयार करण्यात आल्या आहेत. या प्रदर्शनात नाविन्यपूर्ण पाककृतींसह स्तनपानाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि मातृ आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी या अन्नपदार्थांचे पोषणमूल्य अधोरेखित करणारी माहितीही प्रदर्शित करण्यात आली. या कार्यक्रमाचा उद्देश मातृपोषण, यशस्वी स्तनपान आणि बालआरोग्याविषयी जनजागृती करणे होते. पोस्टर स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांना स्तनपान आणि पोषण या विषयांवरील संदेश सर्जनशील पद्धतीने मांडण्याची संधी प्राप्त झाली.

'आईचे पोषण, दुधाचे संवर्धन, उज्वल भविष्याचे संगोपन' या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले पोस्टर प्रेझेटेशन सादर केले. प्रदर्शनीमध्ये विभागातील शालू पारधी व आरजू रहांगडाले या विद्यार्थिनींनी कच्च्या पपईपासून आप्पे, हलवा, पराठा, खीर, लाडू, भाजी आदी विविध पदार्थांचे सादरीकरण केले. अलिझा अहमद या विद्यार्थिनीने खसखस पासून पराठा, बर्फी, हलवा, उपमा, लाडू व भाजीचे प्रदर्शन केले. शोहाबी शेख हिने डिंकापासून हलवा, लाडू, पंजिरी, राब व खीर आदी विविध पदार्थ प्रदर्शित केले. निकहत शेख हिने ओट्स पासून टिक्की, स्मुदी, चीला, इडली व उपमा प्रदर्शित केला. दीप्ती राऊत हिने शेवग्याच्या पानांपासून पराठा, चिला, वडी, शंकरपाळे, लाडू, वडा आदी नाविन्यपूर्ण पदार्थ तयार केले. वैष्णवी हजारे व उमंग चौरागडे या विद्यार्थिनींनी लसूण पासून पराठा, करी, चटणी, खीर व दूध आदी पदार्थ तयार केले. रेणुका बिसणे व सेजल रुईकर यांनी आळीव बियापासून कटलेट्स, मुठिया, पापडी, खीर व हलवा तयार केला. करिष्मा खोब्रागडे हिने जवस पासून चिक्की, लाडू, पराठा, मुखवास व चटणी तयार केली. मीनल पटले व शिवानी कांबळे या विद्यार्थिनींनी मेथी पासून तयार केलेली बर्फी, स्प्राऊट, दालिया, मुखवास, चटणी, पराठा, हलवा व मेथावा आदी पदार्थांचे प्रदर्शन केले. झुनेरा अंबर, धनश्री मोटघरे व अनुष्का वानखडे या विद्यार्थिनींनी कोहळ्याच्या बियापासून सलाद, चटणी, लाडू, पराठा, हलवा, खीर, मुखवास तसेच बडीशेप पासून लाडू, टिक्की, मिल्कशेक, चहा, पनीरभुर्जी आदी पदार्थांचे प्रदर्शन केले. मिताली पारधे या विद्यार्थिनीने बादाम पासून मिल्कशेक, हलवा, कतली, पराठा, पॅन केक, आदी पदार्थ प्रदर्शित केले. मेघा तेलरांधे हिने जव पासून पॅन केक, खीर, पराठा, कुकीज बनवीत प्रदर्शित केले. तिशाली रडके व स्नेहल बंडावार यांनी विड्याची पाने यापासून लाडू, बर्फी, पुलाव, स्वीट राईस, मिल्क शेक प्रदर्शित केले. आस्था वरखडे हिने काळ्या तिळापासून बर्फी, चिक्की, मटरी, स्वीट चपाती, मुखवास आदी प्रदर्शित केले.

वैष्णवी राऊतने खोबऱ्यापासून बर्फी, चटणी, लाडू, पंजिरी व खीर प्रदर्शित केली. चेतन गजघाटे व शिरीन रहमान यांनी खजूर पासून हलवा, लाडू, पराठा, चटणी व खीर पदार्थ प्रदर्शित केले. कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. प्राजक्ता नांदे यांच्या मार्गदर्शनाखाली एमएससी (अन्नशास्त्र व पोषणशास्त्र) तृतीय सत्रातील विद्यार्थिनींनी केले.

पोदार वर्ल्ड स्कूलमध्ये संस्थापक दिन उत्साहात साजरा



नागपूर/ दिलीप येवले

पोदार वर्ल्ड स्कूल, कोराडी रोड, नागपूर येथे संस्थापक दिन (इदल्ही' ॐ) उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास शाळेचे संचालक लॉयड्स सर व उमल लॉयड्स, मुख्याध्यापिका अर्पणा पेंटा, प्रमुख पाहुणे मोहब्बत सिंग तुली, माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व संस्थापकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर मान्यवरांचे बॅज, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह व रोप देऊन स्वागत करण्यात आले. स्वागतगीत व विद्यार्थ्यांच्या आकर्षक स्वागत नृत्याने कार्यक्रमाला उत्साहपूर्ण सुरुवात झाली.

यावेळी मुख्याध्यापिका अर्पणा पेंटा यांनी उपस्थितांचे स्वागत करून संस्थापकांच्या विचारांचा वारसा जपत विद्यार्थ्यांनी ज्ञान, संस्कार, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी, असा संदेश दिला. त्यानंतर विशेष प्रार्थना सभा, शाळेच्या तत्त्वज्ञानावर आधारित विद्यार्थ्यांचे मनोगत आणि शालेय ऑर्केस्ट्राच्या सुरेल सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमात शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. अनुष्का अर्जे यांनी आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रवासातील प्रेरणादायी अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्यांनी चिकाटी, सातत्य, आत्मविश्वास आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या बळावर यश संपादन करता येते, असा प्रेरणादायी संदेश दिला.

यावेळी शाळेच्या नव्या पुरस्काराचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुणे मोहब्बत सिंग तुली यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत जीवनात शिस्त, प्रामाणिकपणा, परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन आणि समाजाप्रती उत्तरदायित्व यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी नवी दिशा मिळाली.

कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शन व राष्ट्रगीताने करण्यात आला.

संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी व सुरेख सूत्रसंचालन शिखा यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापिका अर्पणा पेंटा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत नियोजनबद्ध, उत्साहपूर्ण व यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

१७ ऑगस्टपूर्वी गणना पत्रक जमा करण्याचे मतदारांना आवाहन

नागपूर/ दिलीप येवले

दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत मतदारांना गणना अर्जाचे वितरण, संकलन आणि डिजिटायझेशनचे काम सुरू असून ते पूर्ण करण्याची अंतिम मुदत १७ ऑगस्ट २०२६ आहे. त्यामुळे मतदारांनी गणना पत्रक अचूक भरून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (ब्ध) यांच्याकडे तातडीने जमा करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ज्या मतदारांना गणना अर्ज प्राप्त झाले आहेत त्यांनी अर्जातील आवश्यक माहिती अचूक भरून, स्वाक्षरी करून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बीएलओकडे जमा करावा. गणना अर्ज अद्याप प्राप्त झाला नसल्यास किंवा अर्ज भरण्यासंदर्भात अडचण असल्यास संबंधित बीएलओशी संपर्क साधावा.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत विविध भागांत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. बीएलओ तसेच राजकीय पक्षांचे बूथस्तरीय एजंट (ई) यांच्या समन्वयातून घरोघरी भेटी देऊन प्रलंबित अर्जांचे संकलन करण्यात येत आहे. ५२-नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघात एकूण ३७८ मतदान केंद्रे असून ३७८ बीएलओ कार्यरत आहेत. त्याचबरोबर ३५ बीएलओ पर्यवेक्षक आणि १८ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी आहेत. मतदारसंघात एकूण ४,१२,३४१ मतदार आहेत. ५ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आकडेवारीनुसार बीएलओंनी ३,६२,५०१ (८७.९१ टक्के) गणना पत्रकांचे वाटप केले होते. त्यापैकी २,२२,८६१ (५४.०५ टक्के) पत्रकांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले होते. अनुपस्थित, स्थलांतरित, मृत अथवा दुबार नोंद असलेले ७६,७९५ (१८.६२ टक्के) मतदार निश्चित करण्यात आले आहेत. आयोगाने निश्चित केलेल्या कार्यक्रमानुसार ८ ऑगस्ट ही अंतिम तारीख होती. मात्र, सुधारित कार्यक्रमानुसार ही तारीख आता १७ ऑगस्ट, २०२६ करण्यात आली आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत अनुपस्थित, स्थलांतरित, मृत अथवा दुबार नोंद असलेल्या मतदारांची वस्तुनिष्ठ माहिती बीएलओंना उपलब्ध करून द्यावी. मतदारांनी आपल्या नावाची नोंद, पत्ता, छायाचित्र आणि इतर तपशील योग्य असल्याची खात्री करावी. ज्यांनी अद्याप गणना पत्रक (EFForm) भरून दिलेले नाही त्यांनी संबंधित बीएलओशी संपर्क साधावा आणि शेवटच्या दिवसाची प्रतीक्षा न करता १७ ऑगस्टपूर्वी गणना अर्ज जमा करावा व राष्ट्रीय महत्त्वाच्या कामात प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नागपूर (शहर) सचिन कुमावत यांनी केले आहे.

'करिअर कट्टा' उपक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा- प्राचार्य शरयू तायवाडे'

कोराडी/दिलीप येवले

सच्चिदानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित तायवाडे कॉलेज महादुला - कोराडी येथे तीनही शाखेच्या प्रथम वर्षाला प्रवेशीत विद्यार्थांसाठी करिअर कट्टा इंडक्शन अवेअरनेस प्रोग्रामचे आयोजन केले .या प्रोग्राम च्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य शरयू तायवाडे तर प्रमुख उपस्थिती मा.विक्रांत चीलाटे यांची होती. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील उपक्रमांविषयी माहिती व्हावी तसेच नवीन अभ्यासक्रमाविषयी माहिती व्हावी यासाठी या इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन महाविद्यालयांमध्ये केल्या गेले.याप्रसंगी महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा अंतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स व कौशल्य विकास केंद्र महाविद्यालयात चालवले जाते तसेच या अंतर्गत महाविद्यालयामध्ये विविध कोर्सेसचे आयोजन सुद्धा विद्यार्थ्यांसाठी केले जाते याची माहिती देण्यासाठी सुद्धा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .महाविद्यालयामध्ये चालविण्यात येणारा करिअर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविला जातो याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ .शरयू तायवाडे तसेच समन्वयक डॉ. वर्षा वैद्य यांनी करिअर कट्टा उपक्रमाअंतर्गत होणारे दह म्दले तसेच, नियमित होणारे उपक्रम यांची सविस्तर माहिती दिली .

आपल्या संवादातून हा करिअर कट्टा आपल्या विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टिकोनातून किती महत्त्वाचा आहे तसेच आयएएस आपल्या भेटीला आणि उद्योजक आपल्या भेटीला या सोबतच जर विद्यार्थ्यांना काही नाविन्यपूर्ण स्टार्टअप उद्योग सुरू करायचा असेल तर त्यासाठी सुद्धा करिअर कट्टा कडून मानधन विद्यार्थ्यांना देण्यात येईल जेणेकरून जे विद्यार्थी आपला नवीन उद्योग सुरू करू शकतील याची ग्वाही सुद्धा माननीय प्राचार्यांनी याप्रसंगी दिली .तसेच जर विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करायची असेल तर त्या संबंधीचे सुद्धा अनेक उपक्रम या करिअर कट्टयाच्या माध्यमातून महाविद्यालयात राबविले जातात या अंतर्गत निघणाऱ्या मासिकातून अनेक यशस्वी अधिकाऱ्याची मुलाखत, त्यांनी केलेली तयारी तसेच प्रत्येक महिन्यातील चालू घडामोडी एवढेच नव्हे तर आपल्या क्षेत्रात उद्योग व्यवसायात उत्कृष्ट काम करणाऱ्या उद्योजकांच्या मुलाखती सुद्धा या मासिकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी वाचाव्यात आणि आपल्या आयुष्यात सुद्धा त्याचा काय उपयोग करता येईल याचा विचार करावा असे सांगीतले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर असलेल्या अभ्यासक्रमातील अनेक कौशल्यावर आधारित दोन क्रेडिटचे ध्ह कोर्सेस सुद्धा करिअर कट्टा अंतर्गत घेतली जातात त्या कोर्सेसचा सुद्धा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा आणि करिअर कट्टा मार्फत हे कोर्सेस करताना कोणतीही अडचण येत असेल तर करिअर संसदेच्या सभासदांची मदत घेऊन त्या अडचणी दूर कराव्या असे सुद्धा प्रतिपादन समन्वयक डॉ . वर्षा वैद्य यांनी केले संसदेचा मुख्यमंत्री नीरज गोसाई यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना काय अडचणी असतील तर त्या सोडवण्यासाठी संसदेच्या पदाधिकाऱ्यांकडे संपर्क करावा याबद्दलची माहिती दिली. करिअर कट्टा बद्दलची माहिती पी पी टी द्वारे सर्व विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली जेणेकरून नवीन विद्यार्थ्यांना या करिअर कट्टया बद्दलची संपूर्ण माहिती मिळेल. या कार्यशाळेला प्रथम वर्षाला प्रवेशित तसेच अनेक विद्यार्थी उपस्थित होते करियर कट्टा समन्वयक डॉ. वर्षा वैद्य व डॉ.कमलेश डाबरे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.या कार्यक्रमाचे आभार करिअर संसदेची पदाधिकारी दिप्ती भड हीने मानले.



मुंबईचे नगरपाल कार्यालयातील बेलिफ-लिपिक परीक्षा ६ सप्टेंबरला

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मुंबईचे नगरपाल (शेरीफ) कार्यालयातील बेलिफ-लिपिक, गट-क स्पर्धा परीक्षा २०२६ रविवार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. ही परीक्षा अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई आणि पुणे या जिल्हा केंद्रांवर घेण्यात येणार आहे.

परीक्षेचा पेपर एक सकाळी ११ ते दुपारी १२ आणि पेपर दोन दुपारी ३ ते ४ या वेळेत होणार आहेत. अभ्यासक्रम व निवड प्रक्रियेचा तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्याप्रमाणे राहील.

जाहिरातीनुसार अर्ज केलेल्या उमेदवारांना स्थायी किंवा कायमस्वरूपी निवासाच्या तपशीलानुसार जिल्हा केंद्र उपलब्ध करून दिले जाणार असून, परीक्षेच्या सात दिवस आधी प्रवेश प्रमाणपत्र ऑनलाइन अर्ज प्रणालीतील उमेदवारांच्या प्रोफाइलमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, १५ जून २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या मूळ जाहिरातीतील व ३० जून २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकातील इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन

मुंबई : आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले.

प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता. अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार पैशांअभावी थांबू नये, या उद्देशाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. त्याच भावनेतून प्रशांत इंगळे यांना वेळेत आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देता आली, याचा आम्हाला आनंद आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

- रामेश्वर नाईक
कक्ष प्रमुख
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत.

वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे आपल्याला नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे मनःपूर्वक आभार मानले.



वर्धा : जुनी म्हाडा कॉलनी येथील मारुतीभाऊ समाधीकडे जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत बिकट अवस्था झाली असल्यामुळे ये जा करणाऱ्या वाहन चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

८ ऑगस्टला ३०० खाटांच्या रुग्णालयाचे भूमिपूजन

तळेगाव (शा. पंत) : आमदार सुमित वानखडे यांनी तळेगाव येथे ३०० खाटांच्या अत्याधुनिक रुग्णालयाच्या उभारणीचे दिलेले आश्वासन प्रत्यक्षात येत आहे. येत्या ८ ऑगस्ट रोजी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री पंकज भोयर व आमदार सुमित वानखडे यांच्या उपस्थितीत रुग्णालयाच्या इमारतीचे भूमिपूजन होणार आहे.



या रुग्णालयामुळे आष्टी तालुक्यासह परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असून, उपचारासाठी नागपूर, अमरावती किंवा जिल्हा मुख्यालय गाठण्याची गरज कमी होईल. गंभीर रुग्णांना वेळेत उपचार मिळाल्याने जीवितहानी कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प तालुक्याच्या आरोग्य क्षेत्रासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ लगत तळेगाव असल्याने येथे वारंवार अपघात होतात. नव्या सुसज्ज रुग्णालयामुळे अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळू शकतील. तसेच ग्रामीण भागातील नागरिकांचा वेळ, खर्च आणि मानसिक त्रासही कमी होणार असल्याने या प्रकल्पाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त होत आहेत.

जिल्ह्यात पावसाच्या विश्रांतीनंतर तापमानात वाढ; उकाड्याने नागरिक हैराण

दोन-तीन दिवसांपासून पारा चढता; पावसाच्या पुनरागमनाची प्रतीक्षा कायम



वर्धा : जिल्ह्यात काही दिवस पडलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता. तापमानात लक्षणीय घट झाल्याने नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र गेल्या तीन दिवसांपासून पावसाने पुन्हा विश्रांती घेतल्याने तापमानात सातत्याने वाढ होत असून उष्ण व दमट वातावरणामुळे नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे आता सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरीही पुन्हा एकदा पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. मध्यंतरी झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील कमाल तापमान तब्बल २८ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले होते. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता. सकाळ आणि सायंकाळी हवेत आल्हाददायक थंडावा जाणवत असल्याने नागरिकांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळाला होता. मात्र पावसाने विश्रांती घेताच परिस्थिती झपाट्याने बदलू लागली.

गेल्या दोन-तीन दिवसांपासून सूर्याचे चटके वाढले असून आकाशात ढगांची वर्दळ असली तरी पावसाची साथ मिळत नसल्याने उकाडा अधिकच असह्य झाला आहे. ४ ऑगस्ट रोजी जिल्ह्यात कमाल तापमान ३३.५ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले. तापमानात झालेल्या या वाढीमुळे हवेत दमटपणा वाढला असून दिवसभर अंगाची लाही करणारा उकाडा नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर वर्दळ कमी झाल्याचे चित्र दिसून येत आहे. अत्यावश्यक कामांशिवाय नागरिक घराबाहेर पडणे टाळत असून वृद्ध, लहान मुले आणि आजारी व्यक्तींना या उष्ण व दमट वातावरणाचा सर्वाधिक फटका बसत आहे. वारंवार घाम येणे, थकवा, अस्वस्थता आणि शरीरातील पाण्याची कमतरता जाणवत असल्याने आरोग्याची विशेष काळजी घेण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

पावसाच्या खंडामुळे शेतीवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. खरीप हंगामातील पिकांना या टप्प्यावर नियमित पावसाची गरज असून पाऊस लांबल्यास पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी चिंता शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः सोयाबीन, कापूस आणि तूर पिकांना ओलाव्याची आवश्यकता असल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत.

हवामानातील या बदलामुळे नागरिकांनी उन्हात अनावश्यक वावरणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे, हलका आहार घ्यावा आणि दुपारच्या वेळेत शक्यतो बाहेर पडू नये, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. दरम्यान, पुढील काही दिवसांत पावसाची स्थिती सुधारेल आणि वाढत्या तापमानापासून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. सध्या मात्र वाढत्या उकाड्यामुळे जिल्हावासीयांना पावसाच्या पुनरागमनाची प्रतीक्षा कायम आहे.

राष्ट्रकवी स्मृती समितीतर्फे मैथिलीशरण गुप्त यांची १४० वी जयंती उत्साहात साजरी

वर्धा : राष्ट्रकवी स्मृती समिती, वर्धा आणि विद्यार्थी साहित्य परिषद, महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्था, सेवाग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रकवी मैथिलीशरण गुप्त यांच्या १४० व्या जयंतीनिमित्त सोमवार, ३ ऑगस्ट रोजी आयोजित कार्यक्रमात महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश?वविद्यालच्या कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी प्रमुख पाहुण्या म्हणून मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, मैथिलीशरण गुप्त हे कालजयी कवी असून त्यांच्या साहित्याची उपयुक्तता काळाच्या ओघातही कायम आहे. प्रो. शर्मा म्हणाल्या की, आजच्या तरुणांनी मैथिलीशरण गुप्त यांचे प्रेरणादायी साहित्य वाचले असते, तर अनेक तरुण नैराश्याकडे वळले नसते. त्यांच्या साहित्यामध्ये संकटांवर मात करण्याची प्रेरणा आणि जीवनाला सकारात्मक दिशा देण्याची ताकद आहे. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानाचा उल्लेख करताना त?या म?हणाल?या. गुप्त यांनी खडी बोलीत काव्यलेखन केले आणि भारतीयत्वाचा संदेश देत राष्ट्रीय चेतना जागविण्याचे कार्य केले. वेद, पुराणे आणि उपनिषदांमधून त्यांनी आपल्या लेखनासाठी प्रेरणा घेतली. आजच्या युवा पिढीने त्यांच्या समग्र साहित्याचा पुनर्पाठ करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कस्तुरबा आरोग्य मंडळ, सेवाग्रामचे सचिव डॉ. बी. एस. गर्ग होते. ते म?हणाले की दद्दा या उपाधीने ओळखले जाणारे मैथिलीशरण गुप्त यांचा जन्म झाशीजवळील चिरगाव येथे झाला. त्यांच्या 'भारत-भारती' या ग्रंथावर १९१२ मध्ये ब्रिटिश सरकारने बंदी घातली होती. आपल्या साहित्यामध्ये त्यांनी जनसामान्यांची भाषा प्रभावीपणे वापरली.

यावेळी राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धाचे प्रधानमंत्री डॉ. हेमचंद्र वैद्य, राष्ट्रकवी स्मृती समितीचे संयोजक डॉ. ओ. पी. गुप्ता तसेच महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्था, सेवाग्राम येथील साहित्य परिषदेच्या प्रभारी अधिकारी डॉ. मनीषा भालावी व्यासपीठावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व बीजभाषण डॉ. ओ. पी. गुप्ता यांनी केले.

या निमित्ताने काव्य-संगीत संध्याचे आयोजन करण्यात आले. शुभांगी भाले, अनुराधा भेंडे, अनिल मांडवकर, अरुण कोथळे, श्रीराम वानखडे आणि सहकाऱ्यांनी मैथिलीशरण गुप्त यांच्या रचनांचे सुरेल सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमादरम्यान बहुभाषिक काव्य आणि निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे संचालन डॉ. मनीषा भालावी यांनी केले. काव्यवाचन स्पर्धेत एमबीबीएस अंतिम वर्षाची विद्यार्थिनी आकांक्षा मोहंती हिने प्रथम, तर द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी सायली गोविंदकर हिने द्वितीय क्रमांक पटकावला. निबंध स्पर्धेत सेजल भिसे हिला प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रो. कुमुद शर्मा यांचा परिचय गीता गुप्ता यांनी करून दिला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रकवी मैथिलीशरण गुप्त, महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी आणि डॉ. सुशीला नायर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून तसेच दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अनुपमा गुप्ता यांनी केले, तर बी. एस. मिरगे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. दिलीप गुप्ता, डॉ. सुमन पांडे, डॉ. श्वेता तलहर, नरेंद्र दंढारे, आदित्य हसदे, डॉ. अनिल दुबे, डॉ. अमित विश्वास, भव्या सेठ, चेतन प्रसाद दंढारे आदींनी सहकार्य केले. या कार्यक्रमास हिंदी विश्वविद्यालयाचे कुलसचिव कादर नवाज खान, परीक्षा नियंत्रक डॉ. सुरेंद्र गादेवार, सेवाग्राम रुग्णालयातील विभागप्रमुख, मान्यवर नागरिक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

६.३५ लाखांचा अवैध विदेशी दारूसाठा जप्त

मांडगाव येथे दारूबंदी पथकाची धडक कारवाई



हिंगणघाट : हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या दारूबंदी पथकाने मांडगाव येथे धडक कारवाई करत अवैधरित्या वाहतूक करण्यात येणारा विदेशी दारूचा साठा जप्त केला. या कारवाईत वाहनासह एकूण ६ लाख ३५ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांना एमएच-४७-ए-३८०९ क्रमांकाच्या चारचाकी वाहनातून अवैध विदेशी दारूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार मांडगाव परिसरात नाकाबंदी करून संबंधित वाहनाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनात मोठ्या प्रमाणात विदेशी दारूचा साठा आढळून आला. याप्रकरणी विक्रम संजय मेंढे (रा. विक्रमशिला नगर, वर्धा) याला ताब्यात घेण्यात आले. पो.हवा विकास अवचट यांच्या लेखी तक्रारीवरून आरोपीविरुद्ध हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंधश्रध्दा नाकारून बुद्धाचा वैद्यानिक दृष्टिकोन जगाने स्वीकारला :डॉ. नरेंद्रकुमार कांबळे

वर्धा : जगात दोन रूढी परंपरा आहे एक ईश्वर वाद व निरईश्वरवाद यातील निरईश्वर वाद ही संकल्पना गौतम बुद्धांची असून त्यांनी ध्यानप्राप्ती नंतर निरईश्वर वाद मांडला व या देवाची संकल्पना नाकारली व स्वर्ग नर्क याची सुद्धा संकल्पना पूर्ण पणे नाकारली आज अनेक तत्त्वज्ञान्यानि अभ्यासपूर्वक स्वतःला नास्तिक घोषित केले कारण त्यांना समजले की सर्व निर्मित मनुष्य आहे वीज्ञानाचा शोध होत गेला व यात अदृश्य शक्तीचा कोणताही सहभाग नसून मनुष्य जे काही करतो ते सत्य आहे म्हणून जगाच्या पाठीवर बुद्धाचे तत्त्वज्ञान् स्वीकारून जगाणे अंधश्रधा नाकारून वीज्ञवादाला स्वीकारले व आज जगाने आमूलाग्रह प्रगती केली असे विचार डॉ नरेंद्रकुमार कांबळे



यांनी दिनांक १/८७२०२६ रोजी सत्यवान महेशगौरी यांची आई जैनाबाई काशीनाथजी महेशगौरी यांच्या आईच्या स्मृतीप्रीत्यर्थ प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन सालोडहिरापूर येथे करण्यात आले होते या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ नरेंद्रकुमार कांबळे राज्य सदस्य महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती ,सुरेश रंगारी जिल्हा कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती वर्धा जिल्हा शाखा,सत्यवान महेशगौरी,वासुदेवजी बुरबुरे हिंगणघाट, हे या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते,या प्रंसगी डॉ नरेंद्रकुमार कांबळे व सुरेश रंगारी यांनी विविध चमत्कार सादर करून बुवाबाबान कडून कशी फसवणूक होते या बाबत माहिती दिली,या प्रसंगी कार्यक्रमाची सुरुवात पाण्याचा दिवा पेटवून केली तर मंत्राने बर्फ बनविणे,मंत्राने आग लावणे, होम पाठविणे,भुताची खोपडी दोरीवर चालविणे, खडा नसलेले घुंगरू वाजविणे, या सारखे अनेक प्रयोग सादर करून त्या मागील सायन्स कसे काम करते हे समजावून सांगितले,सदर कार्यक्रम डॉ प्रवीण धाकटे वर्धा जिल्हा अध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती वर्धा जिल्हा शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला होता,

कार्यक्रमातील उपस्थितांचे आभार अमित महेशगौरी यांनी मानले

यशवंत महाविद्यालयात विशेष स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीर

आगामी काळात शाळा-कॉलेजांमध्येही होणार आयोजन



वर्धा : स्थानिक यशवंत महाविद्यालय येथे विशेष 'स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीर' यशस्वीपणे पार पडले. पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले.

'सुरक्षित रहा, आत्मविश्वासी बना' आणि 'स्वतःचे रक्षण, स्वतःचे हात' या ब्रीदवाक्याला सार्थ ठरवत, या शिबिरामध्ये विद्यार्थिनींना विपरित व संकटसमयी स्वतःचे रक्षण कसे करावे, याचे तांत्रिक व प्रात्यक्षिकासह सखोल प्रशिक्षण देण्यात आले. समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी सांगितले की, 'आधुनिक काळामध्ये महिला व मुलींना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनवणे अत्यंत गरजेचे झाले आहे. स्वसंरक्षणाचे धडे हे केवळ शारीरिक बचावासाठी नसून ते मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक विद्यार्थिनीने संकटाच्या वेळी न घाबरता धैर्यर्यान सामना केला पाहिजे.' तसेच, सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांच्या हेल्पलाइन क्रमांकांचा वापर करण्याबाबत आणि सदैव सतर्क राहण्याबाबत मार्गदर्शन केले.

शिबिरात भारतीय न्याय संहिता कलम ३४ ते ४४ नुसार स्वसंरक्षणाचा कायदेशीर अधिकार, मनगट, गळा, मागून पकडल्यास ५ सेकंदात सुटका करण्याच्या प्रात्यक्षिके, बॅटन, मिरची स्प्रे तसेच दैनंदिन वस्तूंचा बचावासाठी वापर, ऑन-ड्युटी व ऑफ-ड्युटी वेळी सतर्कता आणि धोका ओळखण्याचे प्रशिक्षण, ११२ व १०९१ या आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांकांची माहिती या प्रशिक्षणादारम्यान विद्यार्थ्यांना देण्यात आली.

शिबिराच्या समारोप कार्यक्रमाला पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, प्राचार्य डॉ. विलास ठाकरे यशवंत महाविद्यालय, आर.पी.आय. शेख माजीद, डॉ. शार्दूल भालेकर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख, डॉ. सांदीपकुमार रायबोले राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. अर्चना दुपारे, डॉ. मंदा ठेंगणे, पोलीस कवायत प्रशिक्षक शिरीन शेख, महिला पोलीस अंमलदार पल्लवी वाघमारे, वैष्णवी भोयर यांच्यासह शिबिराला महाविद्यालयातील विद्यार्थिनी आणि प्राध्यापक उपस्थित होते.